सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001





संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



संत राजिन्दर सिंह जी महाराज यांच्या पावन सानिध्यात
मंगळवार, मार्च, 31/2026 संगत दर्शन - सायं 7 वाजता
बुधवार, एप्रिल, 1/2026 सत्संग - सायं 7 वाजता नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता
मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी, अहिल्यानगर - 414003
7071050505/9067894213



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २८.०३.२०२६ | अंक नं. २९७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर... चक्क FREE हनिमून टूर — 1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

समता पतसंस्था — नो रिस्क, रिटर्न्स फिक्स — ११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर १०% पर्यंतचे व्याज मिळवा
संपर्क : ७७२२ ०१० २२२
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!


# पाणीपट्टी - घरपट्टी वाढीला विरोध करणाऱ्या नगरसेवकांच्या मालमत्तेतून वसुली करा; महापालिका कर्मचारी युनियनचा इशारा; पगार न दिल्यास ३० मार्चपासून ‘काम बंद’

## परिस्थिती गंभीर; पुढे पाणीपुरवठा व स्वच्छता सेवा देखील बंद करणार; उत्पन्न वाढीला विरोध म्हणजे कुंपणच शेत खात आहे : कर्मचारी युनियनचा संताप

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी व मार्च महिन्यांचे पगार अद्याप न झाल्यामुळे कर्मचारी आर्थिक संकटात सापडले असून, यावरून मनपा कर्मचारी युनियनने तीव्र भूमिका घेतली आहे. सोमवारपर्यंत पगार न झाल्यास काम बंद आंदोलन पुकारण्यात येणार असल्याचा इशारा युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

२७ मार्च रोजी महापालिकेच्या बजेटवर चर्चा करण्यासाठी विशेष सभा बोलावण्यात आली होती. या सभेच्या तोंडावर कर्मचाऱ्यांनी महापालिकेत काम बंद आंदोलन सुरु केले होते. पहिल्या दिवशी या आंदोलनात केवळ मुख्यालयातील कर्मचारीच सहभागी झाले होते. त्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी चर्चा केली. मात्र, आयुक्त डांगे यांनी जीएसटीचे पैसे आले नाहीत. ते आल्यावर सर्वांचे पगार होतील, असे कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यावर कर्मचाऱ्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन सुरुच राहिले.

याबाबत युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी सांगितले की, सुरुवातीला फक्त पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग सुरू ठेवण्यात येईल; मात्र त्यानंतरही पगार न झाल्यास या अत्यावश्यक सेवाही बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले की, शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला असताना उत्पन्न वाढीसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात नाहीत. साधारणपणे दहा वर्षांतून एकदा कररचना (रिव्हिजन) होणे अपेक्षित असते; मात्र तसे होत नसल्याने महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे.

युनियनने नगरसेवकांवरही टीका करत म्हटले की, काही नगरसेवक पाणीपट्टी व घरपट्टी कमी करण्याची मागणी करत आहेत. जे लोक उत्पन्न वाढीला विरोध करतात, तेच व्यवस्थेला अडथळा ठरत आहेत. हे म्हणजे कुंपणच शेत खात असल्यासारखे आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

महापालिकेचा मोठा खर्च दिवाबत्ती, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सेवांवर होत असून, उत्पन्न घटल्यास या सेवांवर परिणाम होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन तसेच इतर देणी प्रामुख्याने जीएसटी अनुदानातून भागवली जात असल्याने, आर्थिक ताण अधिक वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

याच पार्श्वभूमीवर, जर एखाद्या नगरसेवकाने पाणीपट्टी व घरपट्टी वाढीला विरोध केला, तर त्याच्या मालमत्तेतूनच वसुली करण्यात यावी, अशी मागणी आयुक्तांकडे करण्यात येणार असल्याचे युनियनने स्पष्ट केले आहे.

तसेच, महापालिकेने तब्बल २३ वर्षांनंतर घरपट्टी व पाणीपट्टी वाढवली असून, जर यामध्ये पुन्हा कपात करण्याचा दबाव आणला गेला, तर युनियन न्यायालयात जाण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

एकूणच, पगाराचा प्रश्न आणि कररचनेवरील वाद यामुळे महापालिकेत तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, येत्या काही दिवसांत परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


श्री भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव
भक्ती संध्या (जैन लाईव्ह कॉन्सर्ट)
प्रस्तुतकर्ता : श्री पार्थ वखारिया (पुणे)
रविवार दि. 29/03/2026 को शाम 7.30 बजे
स्थान : गणपती मंदिर प्रांगण, महावीरनगर, सावेडी, अहिल्यानगर
वरील कार्यक्रमात सर्वांनी सहपरिवार सामील होवून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा ही विनंती.
- आयोजक -
अरिहंत युवक मंडल, जैन श्रावक संघ, महिला मंडल
सिव्हिल हडको, महावीर नगर, सावेडी, नागापुर परिसर, अहिल्यानगर
- जाहिरात सौजन्य -
चंदुकाका ज्वेलर्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

ADMISSION OPEN — DiSHA COMPUTER INSTITUTE — www.dishagroup.in
MAHA DISCOUNT — ANY COURSE JUST IN 1800/-
COURSES: MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN, C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION
9371051769 | 9371151769 | 7447761769

लहानांपासून मोठ्या मुला मुलींसाठी सेल महोत्सव आठवडा
सोमवार दि. २३/०३/२०२६ ते रविवार २९/०३/२०२६ पर्यंत
ब्रॅण्डेड व प्रिमियम क्वालीटीचे
बाबासुट फक्त रु. ३५०/-
कुर्ता पायजमा (लिनन मध्ये) फक्त रु. ३५०/-
जिन्स पॅन्ट फक्त रु. २००/-
भारी शर्ट फक्त रु. २००/-
टि-शर्ट फक्त रु. १००/- पासुन पुढे
फ्रॉक फक्त रु. २००/- पासुन पुढे
मुलींचे पार्टी वेअर व वेस्टर्न ड्रेस फक्त रु. २००/- पासुन पुढे
पॅन्ट अधिक टि-शर्ट फक्त रु. २००/- पासुन पुढे
फक्त महिलांसाठी ३ पिस सेट रु. ५५० चा १, रु. ६५० चा १, रु. ७५० चा १ — तिनही एकत्र घेतल्यास फक्त रु. १५०० मध्ये
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल



।। जय आनंद ।।
भक्ती संध्या जैन लाईव्ह कॉन्सर्ट
प्रस्तुतकर्ता : श्री पार्थ वखारीया (पुणे)
रविवार दि. २९/०३/२०२६ रोजी, रात्री ७.३० वा.
स्थान : गणपती मंदिर प्रांगण, महावीरनगर, सावेडी
।। जय महावीर ।।
भगवान महावीर जन्मकल्याणक भव्य मिरवणुक
मंगळवार दि. ३१/०३/२०२६ रोजी, दुपारी ४.०० वा.
स्थान : (सावेडी) जैन धर्मस्थानकापासुन निघुन ६.३० वा. (हडको) जैन धर्मस्थानकाजवळ येईल.
वरील कार्यक्रमात सर्वांनी सहपरिवार सामील होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा ही विनंती
आयोजक : अरिहंत युवक मंडळ
हडको, महावीरनगर, सावेडी, नागापुर परिसर, अहिल्यानगर

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजार
डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्युरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिद्ध निहोन-कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कास्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
9257575718
9764416136

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स — चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.



SONI TILES AND MARBLE INDUSTRIES — Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज


प्रथम स्मृतिदिन

दिव्या प्रमाणे तेवते
मनात तुझी आठवण,
तुझ्या संस्काराने समृध्द केले
आमचे जीवन..मायेचा सागर तु,
आभाळाची सावली स्मरण
तुझे होत राहील,
आम्हांस पावलो पावली...

कालकथीत श्रीमती सुशिलाबाई भिमराव साळवे
बुध्दवासी दि. १०-०४-२०२५
आपल्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण अभिवादन !

प्रथम पुण्यस्मरण
रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता

शोकाकुल
अरविंद भिमराव साळवे — चेतन भिमराव साळवे
आनंद भिमराव साळवे — सौ. सफला हंसराज साळवे
प्रतिभा भिमराव साळवे — भावेश चेतन साळवे
मृणाल अरविंद साळवे — शिवानी चेतन साळवे
विधी अरविंद साळवे — विहान आनंद साळवे

ठिकाण : कोहिनूर मंगल कार्यालय, गुलमोहर रोड, पारिजात चौक, अहिल्यानगर


हमारे श्रध्दाके सुखदधाम.. चरणों में हो कोटी कोटी प्रणाम !
राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू. श्री. आनंदऋषिजी म.सा. के चरणों में कोटी कोटी वंदन !
मानवता के युग पुरुष आचार्य गुरुवर्य श्री आनंदऋषीजी महाराज साहबके ३२ वी स्मृतीदिनपर कोटी कोटी वंदना !
राकेश कांतीलाल गांधी संचालक- प्रथमेश लॅमिनेटस्
PRATHMESH LAMINATES
शॉप नं.२, अस्मि प्लाझा, हॉटेल राज पॅलेस के पिछे, टिळक रोड, अ.नगर. मो. ९६८९८९१२९१

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महापालिकेने वाढीव कर कमी करावेत

## महासभेत नगरसेवक रवींद्र बारस्कर यांची मागणी

नगर - अहिल्यानगर महापालिका हद्दीतील नागरिकांना अवाजवी दराने घरपट्टी व पाणीपट्टी आकारण्यात आली आहे. भाडेकरु दराने घरमालकांवर सुमारे ३० टक्के वाढीव कर लावण्यात आला आहे. तसेच शहर व उपनगरांतील अनेक भागांमध्ये ५ ते ६ दिवसांनी पाणीपुरवठा होत असतानाही नागरिकांकडून दरवर्षी सुमारे २४०० रुपये पाणीपट्टी आकारली जाते, असे वास्तव नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापालिकेच्या बजेट सभेत मांडले. याबाबत त्यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन देत हा वाढीवर कर तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.


महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन देताना नगरसेवक रवींद्र बारस्कर. (छाया - लहू दळवी)

निवेदनात म्हटले आहे, महानगरपालिका ही नागरिकांना सेवा देणारी संस्था असून प्रशासकीय काळात इमारत व जमिनीचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी मे. सि. ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेमार्फत करण्यात आलेल्या पुनर्मूल्यांकनाच्या आधारे मालमत्ता धारकांना सुधारित कर नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, या नोटिसांमधील घरपट्टीबाबत अनेक नागरिकांनी हरकत अर्ज दाखल केले असून त्यावर प्रभाग कार्यालयामार्फत सुनावण्या घेण्यात आल्या आहेत. तरीही अद्याप या हरकतींवर अंतिम निर्णय कळविण्यात आलेला नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, स्वमालकीच्या घरांमध्ये भाडेकरूंना राहण्यासाठी जागा देणाऱ्या घरमालकांवर भाडेकरू दराने सुमारे ३० टक्के वाढीव व्यावसायिक कर लावण्यात आला आहे. त्यामुळे घरमालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत असून ही आकारणी पठाणी पद्धतीने केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर पेन्शनधारक नागरिक वास्तव्यास असून त्यांची मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी राहतात. अशा परिस्थितीत स्वतःच्या उत्पन्नावर कुटुंब चालवणाऱ्या या नागरिकांवर वाढीव घरपट्टीचा अतिरिक्त बोजा पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी सन २००३ मध्ये करण्यात आलेल्या पुनर्मूल्यांकनात आरसीसी, लोडबेअरिंग व पत्रा घरांवर माफक दराने कर आकारणी करण्यात आली होती. मात्र, सध्या आकारण्यात आलेली घरपट्टी ही अत्यंत जादा असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शहर व उपनगरांतील अनेक भागांमध्ये ५ ते ६ दिवसांनी पाणीपुरवठा होत असतानाही नागरिकांकडून दरवर्षी सुमारे २४०० रुपये पाणीपट्टी आकारली जात असल्याचा मुद्दाही बारस्कर यांनी उपस्थित केला आहे. गोरगरीब नागरिकांवर याचा मोठा आर्थिक परिणाम होत असल्याने पाणीपट्टीचा दर कमी करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्रोत म्हणजे घरपट्टी, पाणीपट्टी व गाळेभाडे असून अनेक मालमत्तांची नोंद नसल्यामुळे उत्पन्न कमी प्रमाणात मिळत आहे. यामुळे विकासकामांवरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा विषय येत्या विशेष सर्वसाधारण सभेत मांडून, घरपट्टी व पाणीपट्टी कमी करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा आणि नगरकरांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक बारस्कर यांनी केली आहे.


महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन देताना नगरसेवक बाबासाहेब वाकळे, रवींद्र बारस्कर, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेवक करण कराळे, रेवनाथ पवार, नगरसेविका वंदना ताठे. (छाया - लहू दळवी)

# मनपाच्या प्रभाग कार्यालयांना रायगड, शिवनेरी, प्रतापगड, सिंहगड अशी गड-किल्ल्यांची नावे द्या

## माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांची मागणी

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालय व उपकार्यालयांना महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांची नावे देण्याची मागणी पुढे येत आहे. रायगड, शिवनेरी, प्रतापगड, सिंहगड अशी नावेही माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी महापालिकेला सुचविली आहेत. यातून नागरिकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होईल तसेच नव्या पिढीला आपल्या समृद्ध परंपरेची जाणीव होण्यास मदत होईल, असे वाकळे यांनी म्हटले आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे वाकळे यांनी २७ मार्च रोजी महासभेत निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे, महानगरपालिकेचा कारभार हा प्रमुख चार प्रभाग समिती कार्यालये व विविध उपकार्यालयांच्या माध्यमातून चालवला जातो. या कार्यालयांना ऐतिहासिक गड-किल्ल्यांची नावे दिल्यास शहराची ओळख अधिक समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण होईल. महाराष्ट्राच्या इतिहासातील गड-किल्ले हे केवळ वास्तू नसून ते स्वाभिमान, शौर्य आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे हे किल्ले आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात. प्रभाग कार्यालयांना अशी नावे दिल्यास नागरिकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होईल तसेच नव्या पिढीला आपल्या परंपरेची जाणीव होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रभाग समिती क्र. १ (सावेडी) - रायगड, प्रभाग समिती क्र. २ (जुनी मनपा कार्यालय) - शिवनेरी, प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट कार्यालय) - प्रतापगड, प्रभाग समिती क्र. ४ (बुरुडगाव कार्यालय) - सिंहगड, केडगाव उपकार्यालय - राजगड, नागापूर उपकार्यालय - तोरणागड, अशी नावे वाकळे यांनी सुचविली आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेवक करण कराळे, रेवनाथ पवार, नगरसेविका वंदना ताठे आदी उपस्थित होते.

# सावेडी, प्रोफेसर कॉलनी चौकातील कचरा डम्पिंगमुळे आरोग्य धोक्यात

नगर - प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील महानगरपालिकेचे कचरा डम्पिंग स्टेशन आहे. शहरातील सर्व कचरा तेथे गोळा केला जातो. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटते. या दुर्गंधीमुळे लोकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.


प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील कचरा डम्पिंग स्टेशन अन्यत्र हलविण्याचे निवेदन महापौर ज्योतीताई गाडे यांना देताना नगरसेविका सुनिता कुलकर्णी, सोनाबाई शिंदे, नगरसेवक मनोज दुल्लम व करण कराळे. (छाया - लहू दळवी)

२७ मार्च रोजी महापालिकेची बजेट संदर्भात विशेष महासभा झाली. या सभेतही हा प्रश्न उपस्थित केला गेला. प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील महानगरपालिकेचे कचरा डम्पिंग स्टेशन तातडीने अन्यत्र हलविण्यात यावे, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात योग्य विद्युत व्यवस्था व सांडपाणी निचरा करण्याची सोय करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका सुनिता कुलकर्णी, सोनाबाई शिंदे तसेच नगरसेवक मनोज दुल्लम व करण कराळे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, प्रोफेसर कॉलनी चौक हा अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून नाट्यगृहाच्या शेजारीच महानगरपालिकेचे कचरा डम्पिंग स्टेशन आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. याच ठिकाणी अलीकडेच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आलेला असल्याने नागरिकांची वर्दळ वाढली आहे. परिसरातील नागरिकांनी हे डम्पिंग स्टेशन अन्यत्र हलविण्याची वारंवार मागणी केली आहे. जर पुढील एक महिन्यात डम्पिंग स्टेशन हलविण्यात आले नाही, तर नागरिक व संबंधित नगरसेवक उपोषणाचा मार्ग अवलंबतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

प्रोफेसर चौकातील संभाजी महाराज पुतळा परिसरात महानगरपालिकेमार्फत उद्यान विकसित करण्यात आले असले तरी, येथील विद्युत व्यवस्था अत्यंत अपुरी व निकृष्ट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी पुतळा अंधारात राहत असल्याने त्याचा गौरव कमी होत आहे. यासाठी पुतळा परिसरात एक हायमास्ट तसेच उच्च प्रतीचे एलईडी दिवे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून परिसर प्रकाशमान राहील. पुतळा परिसरात सांडपाणी व पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची योग्य व्यवस्था नसल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते, असा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

# वाट पाहणं की चालत राहणं?


राजन कुटे

आपण सगळेच कधी ना कधी कुठल्या ना कुठल्या गोष्टीची वाट पाहत असतो योग्य वेळ येण्याची मार्केट थोडं स्थिर होण्याची किंवा अजून थोडं स्पष्ट होण्याची आणि कळतही नाही, पण ही वाट पाहणं कधी महिन्यांत कधी वर्षांत बदलतं.

खरं सांगायचं तर, आपण वाईट वेळ टाळत असतो असं वाटतं पण थोडा विचार केला तर प्रश्न वेगळाच असतो - आपण खरंच वेळ टाळतोय की अनिश्चिततेपासून दूर राहतोय? कारण अनिश्चिततेत उभं राहणं हे अनेकांना कठीण जातं. म्हणून आपण थांबतो. थोडं अजून बघू असं म्हणतो. पण त्या थांबण्यात नेमकं काय होतं? निर्णय पुढे ढकलला जातो मनातले प्रश्न वाढत जातात आणि वेळ निघून जातो.

इथे एक साधा बदल करून बघता येईल मोठा निर्णय घ्यायची घाई नाही, पण छोटं पाऊल टाकायला हरकत नाही. पूर्ण रक्कम गुंतवायची नसेल पण SIP सुरू करता येईल. सगळं परफेक्ट कळेपर्यंत थांबायचं नसेल पण समजून घेण्याची सुरुवात तरी करता येईल.

एक गोष्ट लक्षात येते का कधी जेव्हा आपण काहीच करत नाही, तेव्हा वेळ खूप संथ वाटतो पण जेव्हा आपण काहीतरी करत असतो, तेव्हा तोच वेळ कसा सहज निघून जातो. म्हणून कदाचित प्रश्न योग्य वेळेचा नसतो.

प्रश्न इतकाच असतो - आपण अजूनही तिथेच उभे आहोत की चालायला सुरुवात केली आहे? गुंतवणुकीतही हेच लागू होतं. परफेक्ट क्षण शोधताना, अनेकदा चांगले क्षण निसटून जातात. पण छोट्या पावलांनी सुरुवात केली, तर पुढचा मार्ग आपोआप दिसू लागतो. आज काही मोठा निर्णय घ्यायची गरज नाही.

फक्त स्वतःला शांतपणे एक प्रश्न विचारा - मी अजून वाट पाहतोय की मी चालायला सुरुवात केली आहे?

महत्वाचा विचार - परफेक्ट निर्णयापेक्षा, सुरू केलेला निर्णय जास्त महत्त्वाचा असतो.

शांत ठेवा. स्पष्ट ठेवा.

- **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# दशरथ चव्हाण यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सिव्हील हडको येथील रहिवासी दशरथ रेखु चव्हाण (वय ७५) यांचे २७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुनील, जयसिंग, बाळासाहेब चव्हाण यांचे ते वडील होत.

# यमुनाबाई जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - गुंडेगाव येथील तुकाई मळ्यातील रहिवासी सौ. यमुनाबाई सोनबा जाधव (वय ९०) यांचे २७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ मार्च रोजी गुंडेगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पोपट, शिवाजी, संभाजी जाधव यांच्या त्या मातोश्री होत.



## हनुमान चालिसा पाठ

**रविवार दि. २९/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**राजेश अमृतलाल चंगेडे गोळीवाले (परिवार),** अमृतकमल बंगला, माणिकनगर, स्टेशनरोड, ९२२६२३२२२९

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**शिवशंकर प्रतिष्ठाण,** पंचपीर चावडी, माळीवाडा, तुषार भागानगरे ९४०५०५५५२०, शुभम भागानगरे ८४८५८५२८३८

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**विनायक रेसिडेन्सी मित्र मंडळ,** सर्व मंगल कार्यालयाच्या जवळ, सारसनगर ८८८८५७९६१९, ८९९९०७९०८६

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**दुडगु परिवार एवम् नवरंग व्यायाम शाळा,** चंद्रभागा निवास, नवरंग व्यायाम शाळेजवळ, तोफखाना

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री काळा मारुती मंदिर ट्रस्ट,** बुरुडगल्ली तरुण मंडळ, बुरुडगल्ली, अहिल्यानगर ९४२२३७७८५०



## हनुमान चालिसा पाठ

**सोमवार दि. ३०/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**शिव हनुमान मंदिर,** भुतकरवाडी, महालक्ष्मी उद्यान जवळ, भुतकरवाडी ९४२००३५३९९

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**भारत सहकार मित्र मंडळ,** जय आनंद महावीर चौक, दाळमंडई, आडते बाजार, बंटी डापसे ९७३०१६००५९

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**रामचंद्र पर्वते,** नानाजी नगर, सारसनगर ९१७५५७५७५७

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**जय श्री महाकाल ग्रुप,** छाया टॉकीज जवळ, चितळे रोड

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री संकटमोचन हनुमान मंदिर,** नित्य सेवा सोसायटी, पाईपलाईन रोड, ९८९०९४०००३, ९८८१९८७३८०

# कर्मचाऱ्यांचे थकीत पगार तातडीने अदा करा

## स्थायी समितीच्या सभेत सभापती सुभाष लोंढे यांचे प्रशासनाला आदेश

नगर - महापालिका कर्मचाऱ्यांच्या थकीत पगाराचा मुद्दा स्थायी समितीच्या सभेत चांगलाच गाजला. फेब्रुवारी व मार्च महिन्यांचे पगार अद्याप न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतली. यावर स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांनी महापालिकेच्या खात्यातून तातडीने कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावेत, असे स्पष्ट निर्देश महापालिका प्रशासनाला दिले. त्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न मार्गी लागला आहे.


महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत बोलताना सभापती सुभाष लोंढे. यावेळी सदस्य बाबासाहेब वाकळे, मनोज कोतकर, निखिल वारे, सुरेश बनसोडे यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. (छाया - लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत शहरातील विविध विकास कामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. तसेच विविध विभागांमध्ये मानधनावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासही हिरवा कंदील देण्यात आला. सभेमध्ये महापालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांबाबत महत्त्वाची चर्चा झाली. न्यायालयीन कामकाजासाठी विधी तज्ज्ञांना पॅनलवर नियुक्त करण्यासंदर्भातील विषय सध्या स्थगित ठेवण्यात आला. यावेळी सदस्यांनी केवळ केस जिंकणाऱ्या वकिलांनाच पॅनलवर घ्यावे, अशी मागणी केली. यावर सभापती सुभाष लोंढे यांनी ज्येष्ठ व अनुभवी वकिलांशी चर्चा करून सक्षम विधी तज्ज्ञांची नियुक्ती करावी आणि न्यायालयात महापालिकेची बाजू प्रभावीपणे मांडावी. महापालिकेच्या शिल्लक रकमेतून सर्व कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावेत व शासनाकडून निधी आल्यानंतर तो संबंधित खात्यात वर्ग करावा, परंतु कर्मचाऱ्यांना विलंब होऊ देऊ नये, असे निर्देश सभापती लोंढे यांनी दिले.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे यांनीही विविध मुद्यांवर आपली मते मांडली. तसेच सदस्य मनोज दुल्लम, नगरसेविका संध्या पवार, सोनाबाई शिंदे, मीनाताई चोपडा, गौरी बोरकर, पौर्णिमा गव्हाळे, उपायुक्त मेहेर लहारे आदी उपस्थित होते.

# दोन दुचाकींच्या धडकेत एकाचा मृत्यू

नगर - दोन दुचाकींची समोरासमोर धडक होवून त्यात एका दुचाकीस्वाराचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट ते वाळकी जाणाऱ्या रोडवर २६ मार्च रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. शफीक सलीम मणियार (वय ३९, रा. वडगाव शेरी, पुणे) असे मयताचे नाव आहे. याबाबत जावेद मोहिद्दीन मणियार (वय ४८, रा. वडगाव शेरी, पुणे) यांनी २७ मार्च रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा पुतण्या शफीक व सून असे त्यांच्या मोटारसायकल वर जात असताना भरधाव वेगात आलेल्या एका हिरो कंपनीच्या पॅशन मोटारसायकलने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत शफीक हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत जावेद मणियार यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पॅशन मोटारसायकलवरील चालका विरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चारचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

नगर - पायी रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाने दिलेल्या धडकेत एकाचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना नगर - मनमाड महामार्गावर विळद येथील बसस्थानकाजवळ २६ मार्च रोजी सकाळी ११.५५ वाजण्याच्या सुमारास घडली. योगेश चंद्रभान अडसुरे (वय ४६, रा. विळद, ता.नगर) असे मयताचे नाव आहे. याबाबत मयताचा भाचा चैतन्य रामदास भंडारे (वय २५, रा. विळद, ता.नगर) यांनी २७ मार्च रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे मामा योगेश अडसुरे हे विळद बसस्थानकाजवळ रस्ता ओलांडत असताना राहुरी कडून नगरच्या दिशेने भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत अडसुरे हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. चैतन्य भंडारे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पालिकेच्या गाड्या बेकायदेशीरपणे रस्त्यावर धावतात, गुन्हा दाखल करायचा का?

## महापालिकेच्या सभेत ब्लड बँक, कर्मचारी नियुक्त्या, बांधकाम परवान्यांवरुन वादंग

नगर - महापालिकेच्या मालकीच्या ९२ पैकी ७० गाड्या रोज रस्त्यांवर धावतात. या वाहनांचा विमा उतरविलेला नाही. उद्या अपघात झाला तर महापालिका संबंधिताला भरपाई देणार आहे का? या वाहनांचा विमा का उतरविला नाही? बेकायदेशीरपणे वाहने रस्त्यावर कशी पळविता? अशी वाहने रस्त्यावर पळविल्यास होणारा गुन्हा आणि त्याची शिक्षा काय? पालिकेवर यासंबंधी गुन्हा दाखल करायचा?, असे प्रश्न उपस्थित करीत नगरसेवक निखिल वारे यांनी अधिकाऱ्यांची बोलतीच बंद केली. तसेच कर्मचारी नियुक्त्या, बंद असलेली ब्लड बँक, ब्लू लाईनमधील बांधकाम परवानग्या अशा विविध मुद्यांवरुन नगरसेवकांनी पालिका प्रशासनाला धारेवर धरले.


अर्थसंकल्पीय सभेत बोलताना नगरसेवक गणेश भोसले. (छाया - लहू दळवी)

२८ मार्च रोजी दुपारी महापालिकेच्या अर्थसंकल्पीय महासभेत नगरसेवकांनी विविध विषयांवर प्रशासनाला जाब विचारला. कुमार वाकळे यांनी कोर्टाच्या आदेशानंतरही कर्मचाऱ्यांना नियुक्त्या का देण्यात येत नाहीत, असा सवाल उपस्थित केला. यावर उपायुक्त लहारे यांनी काही कर्मचाऱ्यांची कागदपत्रे प्रलंबित असल्याचे सांगितले. त्यावर वाकळे यांनी ज्यांची कागदपत्रे पूर्ण आहेत, त्यांना त्वरित नियुक्त्या द्याव्यात, अशी मागणी केली.

ब्लड बँक बंद असल्याचा मुद्दा उपस्थित करत विकास जगताप यांनी दरमहा सहा लाख रुपये खर्च होऊनही किती कॅम्प घेतले, असा प्रश्न विचारला. त्यावर डॉ. शंकर शेडाळे यांनी गेल्या तीन महिन्यांपासून कर्मचारी नसल्यामुळे सेवा बंद असल्याचे स्पष्ट केले. यावर जगताप यांनी महापालिकेला चालवता येत नसेल तर एखाद्या संस्थेला चालवायला द्यावी, अशी भूमिका मांडली. निखिल वारे यांनीही अत्यावश्यक सेवा असताना कर्मचारी नियुक्त न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. गणेश भोसले यांनी ब्लड बँक नवीन हॉस्पिटलमध्ये स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव मांडला, तर अविनाश घुले यांनी स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय घ्यावा, असे सुचवले. यावर महापौर व उपमहापौर यांनी चर्चा करून नागरिकांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

संपत बारस्कर यांनी प्रभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे कामकाजावर परिणाम झाल्याचे सांगत प्रशासनावर टीका केली. आयुक्त यशवंत डांगे यांनी नियोजनासाठी फेररचना केल्याचे स्पष्ट केले. मात्र, दिलेले कर्मचारी काम करत नसल्याची तक्रार बारस्कर यांनी केली.

मागासवर्गीय कल्याणकारी निधीच्या खर्चावर मयूर बांगरे यांनी प्रश्न उपस्थित करत रोख स्वरूपात तरतूद करण्याची मागणी केली. आयुक्त डांगे यांनी इतर निधीतून कामे होत असल्याचे सांगितले.

ब्लू लाईनमधील बांधकाम परवानग्यांवरून सभेत तीव्र वाद झाला. मयूर बांगरे यांनी अंतिम मंजुरी असलेल्या लेआऊटमध्ये परवानगी का दिली जात नाही, असा प्रश्न उपस्थित केला. वैभव जोशी यांनी ब्लू लाईनमध्ये परवानगी देता येत नसल्याचे सांगितले. यावर विकास जगताप यांनी मग लेआऊट मंजूरच का केले? असा सवाल उपस्थित केला. स्नेहल यादव यांनी चुकीच्या मंजुरी दिल्या असतील तर त्या शासनाला कळवून निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. नागरिकांची फसवणूक होत असल्याचा आरोप करत संपत बारस्कर व विकास जगताप यांनी संबंधित प्लॉट महापालिकेने विकत घ्यावेत, अशी मागणी केली. वंदना ताठे यांनी वैभव जोशी यांच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी केली. आयुक्त डांगे यांनी त्याबाबत खातेनिहाय चौकशी सुरू असल्याचे सांगितले.

महापालिकेतील मालमत्ता नाव नोंदणीच्या प्रक्रियेत अडथळे येत असल्याची बाब अविनाश घुले व रवींद्र बारस्कर यांनी मांडली. यावर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

शहरातील रस्ते खोदाईच्या मुद्यावर निखिल वारे यांनी शासनाच्या आदेशाला विरोध दर्शवत नव्याने परवानगी देऊ नये, अशी भूमिका मांडली. गणेश भोसले यांनीही नवीन रस्ते फोडू देणार नसल्याचे स्पष्ट केले. बाबासाहेब वाकळे यांनी परवानगी नसलेल्या भागात कनेक्शन कसे दिले, याबाबत प्रश्न उपस्थित केला. आयुक्त डांगे यांनी संबंधित विभागांकडून परवानगी मागितल्याचे सांगितले.

महिलांसाठी स्वच्छतागृहांची उभारणी करण्याची मागणी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप तसेच सुनीता भिंगारदिवे यांनी केली. यावर आयुक्तांनी जागा सुचवण्याचे आवाहन केले. केडगाव परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येकडे लक्ष वेधत अमोल येवले यांनी चार ते सहा दिवसांनी पाणी येत असल्याची तक्रार करीत दोन नवीन पाण्याच्या टाक्या उभारण्याची मागणी केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उन्हाळ्यातही शरीर ठेवा थंड

तापमान वाढत असताना, लोक आरामासाठी रेफ्रिजरेटर आणि एसीमधील थंड पाण्याकडे वळत आहेत. पण तुम्हाला माहित आहे का की आजही खेड्यांमध्ये लोक विजेशिवाय स्वतःला थंड ठेवतात? आयुर्वेद आणि ग्रामीण जीवनातील हे जादुई उपाय तुम्हाला केवळ थंड ठेवणार नाहीत तर उष्माघात आणि निर्जलीकरणापासून देखील वाचवतील. जरी शहरांमध्ये आरओ आणि रेफ्रिजरेटरचा वापर वाढत्या प्रमाणात होत असला तरी, मातीच्या भांड्याचा (मटका) वापर अतुलनीय आहे. मातीच्या भांड्याच्या मातीमध्ये नैसर्गिक छिद्रे असतात जी बाष्पीभवनाद्वारे पाणी थंड करतात. हे पाणी केवळ थंडच नाही तर शरीरातील चयापचय देखील राखते. रेफ्रिजरेटरमधील अत्यंत थंड पाणी घशासाठी आणि पचनासाठी हानिकारक असू शकते, तर घागरातील पाणी घशासाठी सौम्य असते. आज गावांमध्ये एसीमधून येणाऱ्या कृत्रिम हवेऐवजी, व्हेटिव्हरच्या ओल्या ज्यूटच्या पोत्या खिडक्यांवर ठेवल्या जातात. जेव्हा बाहेरची गरम हवा या ओल्या पडद्यांमधून जाते तेव्हा ती खोलीचे तापमान ५ ते १० अंशांनी कमी करते. त्यांचा सूक्ष्म सुगंध मनाला शांत करतो आणि नैसर्गिक थंडावा अनुभव देतो.

## पाककला

### छोले कटलेट

**साहित्य :** एक कप -भिजवलेले छोले, एक -कांदा, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा -आले पेस्ट, कोथिंबीर, मिरचीचे तुकडे, एक चमचा -चाट मसाला, अर्धा चमचा -मिरे पूड, ब्रेडचे तुकडे, चवीनुसार मीठ

**कृती** - सर्वात आधी एका भांड्यात भिजवलेले छोले घ्यावे आता त्यात आल्याची पेस्ट, मिरची, ब्रेडचे तुकडे, मीठ, चाट मसाला आणि काळी मिरे पूड घालावी. तसेच आता आता ते मिक्सरमध्ये टाका आणि पेस्ट बनवा. आता चिरलेला कांदा आणि ब्रेडचे छोटे तुकडे घाला. यानंतर त्यात चार चमचे मैदा घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात बेसन आणि रवा देखील घालू शकता. तसेच तुम्ही त्यात उकडलेले बटाटे, किसलेले चीज किंवा काजू देखील घालू शकता. आता त्यात थोडे तेल घाला आणि पीठ हातात घ्या आणि त्याला कटलेट किंवा टिक्कीचा आकार द्या. यानंतर ते शॅलो फ्राय करा. जास्तीचे तेल शोषून घेण्यासाठी ते टिश्यू पेपरवर ठेवा. आता त्यावर चाट मसाला शिंपडावा. तर चला तयार आहे आपली छोले कटलेट रेसिपी, चटणी सोबत नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### जिममध्ये दिवे असे लावा

* तुमच्या जिममध्ये क्यूई किंवा सकारात्मक उर्जेचा प्रवाह वाढवा, दिवे कुठे लावायचे याची काळजी घ्या. व्यावसायिक जिमसाठी वास्तुशास्त्रानुसार, जिमच्या उत्तर किंवा पूर्व भिंती चमकदार दिवे बसवण्यासाठी सर्वात योग्य आहेत.

* त्याशिवाय, जिममध्ये चमकदार दिवे वापरा यामुळे चिकाटी आणि वाढीची भावना निर्माण करा.

## सौंदर्य

कडुलिंबाच्या पाण्याने केस धुण्याने बॅक्टेरिया आणि कोंडा नष्ट होतो, ज्यामुळे केसांचा तेलकटपणा मुळापासून दूर होतो.

## सल्ला

* उपमा तयार झाल्यावर शेवटी वरून १ चमचा साजूक तूप सोडल्यास चव अधिकच छान लागते.

* उपम्याला खरी चव आल्यामुळे येते, त्यामुळे आले किसून नक्की टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २९ मार्च २०२६

**कामदा एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, आश्लेशा १४।३८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे पदार्थ, हॉटेलिंग वगैरे जपून करा. मागील उधारी वसुल होईल.

**मकर** : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे जपून वापरा.

**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. ईच्छित योजना अंमलात येईल.

## शब्दगंध क्र. ७३९७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | ९ | | | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | |
| ■ | ■ | ■ | १३ | | १४ | ■ | |
| १५ | | | ■ | १६ | | | ■ |
| | ■ | ■ | १७ | | | ■ | १८ |
| १९ | २० | | | ■ | २१ | | |
| २२ | | ■ | २३ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) राजाधिराज ४) हिंमत; शक्ती; उसण ७) गोळा झालेले; आय ८) जड; प्रतिष्ठित; पतदार १०) स्त्रीचे एक नाव; एक दिवंगत मराठी अभिनेत्री - ++ लागू ११) विष्णूची पत्नी; लक्ष्मी १२) आवाज; ध्वनी; साउंड; नाद १३) पदार्थाचा उडालेला तुकडा १५) झेंडा विशेषतः इशारा देणारा १६) जेथे जहाजे थांबतात ते समुद्राकाठचे ठिकाण १७) एक छोटा जीव; गणपतीचे वाहन १९) आशय; हेतू; स्वार्थ २१) मातीच्या फुटलेल्या भांड्याचा तुकडा २२) कुठेही गेले तरी पळसाला पाने इतकीच असतात २३) नृप; भूपती; राजा

**उभे शब्द :-** १) एक धान्य २) मोठा नगारा; एक प्रकारची तोफ; कडाबीन ३) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा ४) वित्त; संपत्ती; संपदा ५) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त ६) लग्न समारंभातील वधूच्या किंवा नवरदेवाच्या बहिणीची भूमिका ९) बाहेर सार्वजनिक ठिकाणी लोकांना एकत्र येण्यास पोलिसांकडून करण्यात आलेली मनाई १४) एक दिवंगत हिंदी चित्रपट खलनायक तथा चरित्र अभिनेता १५) राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा मतदारसंघ १७) उंबरठा १८) आपला देश २०) शरीर; देह; कुडी

### शब्दगंध क्र. ७३९६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ना | म | त | ■ | अं | जी | र |
| प | सा | ■ | पा | त | क | ■ | म |
| मा | ■ | का | स | रा | ■ | पा | णी |
| न | भ | ■ | नी | ळ | कं | ठ | ■ |
| ■ | व | री | स | ■ | ब | क | रा |
| भि | सा | ळ | ■ | व | र | ■ | ज |
| रा | ग | ■ | गो | रा | ■ | ना | व |
| ज | र | ठ | ■ | ह | ल | क | ट |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : प्रत्येकाचा एक ठराविक काळ असतो त्यानंतर ना वेळ असते ना किंमत असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणत्या लोकांना डास चावत नाहीत?

डास चावणे यामागे रक्तगट मोठी भूमिका बजावू शकतो. संशोधनातून असे दिसून आले आहे की डास कोणत्या रक्तगटाच्या लोकांपासून दूर राहतात आणि डास कोणत्या रक्तगटाच्या लोकांना जास्त चावतात. कधी पहिले आहे का डास काही लोकांना जास्त चावतात आणि काहींना अजिबात चावत नाहीत? हो, हे खरोखर घडते. काही रक्तगटांना डास जास्त आकर्षित करतात. विशेषतः 'ओ' रक्तगट असलेल्या लोकांना डास सर्वात जास्त चावतात. या रक्तगटाचे लोक जिथे बसतात तिथे डास खूप चावतात आणि त्या जागी लाल रंगाची खूण तयार होते. याशिवाय काही इतर कारणे देखील आहे ज्यामुळे डास जास्त चावतात. खरं तर, डास मानवी शरीरातून बाहेर पडणारा वास, कार्बन डायऑक्साइड आणि त्वचेची रसायने ओळखून त्यांचा शिकार निवडतात. ओ गटाच्या लोकांच्या शरीरातून बाहेर पडणारी रसायने डासांना सर्वात जास्त आकर्षित करतात. तसेच बी रक्तगटाचे लोक दुसऱ्या क्रमांकावर येतात, ज्यांना डास सर्वात जास्त चावतात. आता त्या लोकांबद्दल बोलूया ज्यांना डास फार क्वचितच चावतात. जाणून घ्या की जर तुमचा रक्तगट 'ए' असेल तर तुम्ही थोडे 'भाग्यवान' आहात. खरं तर, या रक्तगटाचे लोक डास फार क्वचितच चावतात.

### भक्त प्रल्हाद

एकदा हिरण्यकश्यपू राजाने घोर तप करून देवाला प्रसन्न केले आणि त्यांच्याकडून वर मागितला की त्याला माणसाकडून किंवा प्राण्याकडून, दिवसा किंवा रात्री, घरात किंवा घराबाहेर मरण येणार नाही. तसेच ब्रह्मांनी तथास्तु म्हटत त्याला वर दिले आणि यामुळे त्याला वाटू लागले की तो आता अमर झाला त्याचा कुणीही वध करू शकणार नाही.

हिरण्यकश्यपू राजाला प्रल्हाद नावाचा मुलगा होता. प्रल्हाद हा देवभक्त होता तो भगवान विष्णूंचा मोठा भक्त होता व सतत त्यांचे नामस्मरण करीत असे. प्रल्हाद सतत नारायण नारायण असा जप करतच असे. वडिलांना त्यांचे जप करणे सहन होत नव्हते. त्याला अनेकदा समजावून सांगितल्यावर देखील त्याचा जप सुरुच असायचा. तसेच घाबरवण्याचा देखील प्रयत्न केला परंतू प्रत्येक वेळी तो अयशस्वी ठरला. कारण भक्त प्रल्हादावर त्याचा काही परिणाम होत नव्हता. आता अखेर हिरण्यकश्यपूने आपल्याच मुलाचा वध करण्याचा निर्णय घेतला. त्याने आपली बहिण होलिकाची मदत घेतली. होलिकाला वरदान मिळालं होतं की तिला आग भस्म करु शकत नाही. म्हणून तिला अग्नीचे भय नव्हते. हिरण्यकश्यपूने होलिकेला भक्त प्रल्हादाला मांडीवर घेत आगीच्या चितेवर बसण्यास सांगितले. प्रल्हाद तेव्हा देखील भगवान विष्णूंच्या नामस्मरणात तल्लीन होता.

प्रल्हादाच्या भक्तिसाधनेमुळे उलटेच घडले. त्या चितेमध्ये होलिका जळून खाक झाली आणि विष्णू भक्त असल्यामुळे प्रल्हादाला अग्नी देखील काही करु शकली नाही.



## जीवन का अमृत (भाग १)

### आज्ञा पालन

में फँस जाते हैं, उनको दोबारा मनुष्य जन्म लेना होता है, ताकि रूहानी रास्ते पर उनकी तरक्की होती रहे। जिनके जीवन का मुख्य लक्ष्य सत्गुरु हो जाता हैं और जिन्हें उसमें विश्वास है, उन्हें दोबारा जन्म ही नहीं लेना होता। उनकी आत्माएँ निचले मंडलों में पहुँचा दी जाती हैं, जहाँ सत्गुरु की दया से, वे उन्नति करती हैं और अंत

में अपने सच्चे घर पहुँच जाती हैं। साधारणतया, एक नामलेवा, अपना पाठ पूरा करने के लिए चार जन्म लेता है, पर यह कार्य सत्गुरु के आज्ञा पालन से और उसमें श्रद्धा और विश्वास रखने से, एक जन्म में भी पूरा हो सकता है । सत्गुरु सदा शिष्यों के साथ है, उनके सिरों पर कार्यरत है। वह उनके विचारों और इच्छाओं से अनभिज्ञ नहीं है और वह उनके कर्मों का हिसाब चुकाता है, ताकि उनको बार-बार इंसानी जन्म लेने की जरूरत से मुक्त करा सके ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

शिवानीदीदी : त्या काळी आपण भावनिक म्हणजेच मानसिकदृष्ट्या खूप निरोगी होतो. घडलेल्या घटना सोडून द्यायची आणि भूतकाळ विसरून जायची शक्ती आपल्याकडे होती. आपण एकमेकांशी तडजोड करून राहू शकत होतो. शेजारीपाजारी सगळे मिळून शंभर जणही एक कुटुंब म्हणून राहू शकत होते. कालांतराने आपण कमकुवत झालो आणि एकत्र कुटुंब पद्धतीवर सीमित झालो, जिथे एका कुटुंबात अंदाजे १५ जण असत. हळूहळू स्वत:ची काळजी न घेतल्यामुळे आपण मानसिकदृष्ट्या जास्तच कम कुवत झालो. त्यामुळे आपण आणखीनच छोट्या कुटुंबात राहायला लागलो. पुढे जाऊन त्या छोट्या कुटुंबात सगळ्यांबरोबर राहणंही कठीण वाटू लागलं आणि आपण वेगळे राहू लागलो. आजकाल तर नवरा आणि बायको या दोघांनाही एकत्र राहण्यासाठी धडपड करावी लागते. घटस्फोटाचा दर आज जास्त का आहे?

लोक असं म्हणतात की, घटस्फोटाचा दर जास्त असण्याचं कारण दोघांनाही त्यांच्या त्यांच्या कामाचा असणारा ताण आहे. पण असं नाहीये. मूळ कारण दोघेही त्यांच्या 'अंतर्गत स्व'ची काळजी घेत नाहीत हे आहे. मग जेव्हा ते रोज संध्याकाळी तणावग्रस्त होऊन घरी येतात तेव्हा ते परस्परांना नकारात्मक ऊर्जेचे आदानप्रदान करतात.

सुरेश ओबेरॉय : पूर्वीच्या काळीसुद्धा, नवराबायको दोघेही समसमान कष्ट करत होते. गावांमध्ये, एक जण बाहेरची शेताची कामं बघायचा तर दुसरा घर, स्वयंपाक आणि गोठ्याची काळजी घ्यायचा. शिवानीदीदी : आजच्या काळात स्पर्धा नक्कीच वाढली आहे. पण पूर्वीच्या काळात आणि आताच्या काळात मुख्य फरक हा आहे की, आपल्या जबाबदाऱ्या सांभाळत

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : मित्रा! मी काही नवीन व्यावसाय सुरू करतो तेव्हा माझी बायको मध्ये येते.

मन्या : तू ट्रक चालवण्याचा प्रयत्न कर कदाचित नशीब तुला साथ देईल.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील १ ली महिला रेल्वे मंत्री कोण होत्या?

- ममता बॅनर्जी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'लेखन...'

गेल्या अनेक वर्षांपासून वाचक, परिचित, मित्र, नातेवाईक मला 'हा' प्रश्न अगदी आवर्जुन विचारतात, 'तुम्ही एवढं लेखन कसं करु शकता?' ह्या सर्वांचा प्रश्न अगदी बरोबर आहे. मी सकाळी साडेनऊ वाजता घरुन निघतो. ऑफिसमधुन सायं ६ ते ६.३० वाजेदरम्यान निघतो. घरी येतो. एखादी मालिका, जेवण, शतपावली तोपर्यंत दहा वाजतात. झोपणं, दुसऱ्या दिवशीही हिच दैनंदिनी. शनिवार, रविवारी सुट्टी असते. त्यावेळी घरातली काही कामं, लेखन-वाचन, आवडीच्या कृती करणं. अनेकांचं असं म्हणणं आहे की नोकरी, संसार सांभाळुन एवढं लेखन करणं अशक्य आहे. म्हणूनच तुम्हा सगळ्यांना मी सांगु इच्छितो की तुम्हालाही दिवसाचे २४ तास मिळालेत तसेच मलाही तेवढेच तास मिळालेत परंतु त्या २४ तासांचं नियोजन मी विचारपूर्वक करतो म्हणून गेल्या ३५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून लेखन चालु आहे. मुळात लेखन ही व्यक्त होण्यासाठीची एक अत्यंत चांगली कला आहे असं मला वाटतं. कागद, पेन घेतला आणि लिहिलं असं नसतं. लेखन करण्यासाठी प्रचंड वाचन करावं लागतं. मनन-चिंतन, चांगल्या-वाईट अनुभवांचं आदान-प्रदान व्हावं लागतं, विविध ठिकाणी जाणं, एकांकिका - नाटकं, संगित मैफिली, गेट-टु गेदर, मित्र - नातेवाईकांकडे जाणं, निसर्गाच्या सहवासात जाणं... ह्यांसह अनेक गोष्टी कराव्या लागतात. शिवाय प्रत्येक अनुभव शब्दबध्द करता येईलच असं नाही. काही वेळी त्या अनुभवाला काल्पनिकतेची जोड द्यावी लागते. मला सांगायला नक्कीच आवडेल की गेल्या ३५ वर्षांहुन अधिक काळ लेखन करतो आहे पण सामाजिक जाण आणि भान ठेऊन लेखन करत असल्याने योग्य तेच लिहिलं आहे, ह्यापुढेही लिहिणार आहेच.

माझं हे लेखन गृहिणी, वेटर, वॉचमन, रिक्षावाले, विद्यार्थी तसेच डॉक्टर, वकिल, इंजिनिअर, कलाकार असे विविध वयोगटातील आणि विविध क्षेत्रातील व्यक्ती वाचतात. मेसेज, फोन अथवा प्रत्यक्ष भेटीत अभिप्राय देतात. कोणत्याही लेखक, कलाकार, तंत्रज्ञ, व्याख्याते ह्यांना वाचक- रसिकांकडुन अभिप्राय मिळाले की प्रोत्साहन मिळतं, आनंद होतो. गेली १२ वर्षे साहित्य सहवासच्या माध्यमातुन आपली भेट होते आहेच. जे जे विविध वयोगटांसाठी उपयुक्त आहे ते ते दिलं आहे, देतो आहे. ह्यापुढेही देणारंच आहे. अनेकजण मला म्हणाले आहेत की लेखन ही कला खूपच कष्टदायी आहे. अगदी बरोबर आहे त्यांचं म्हणणं. व्यक्तीजवळ मुळात जे असतं तेच ती इतरांना देते. देण्यासारखं सुख नाही. आनंद नाही. माझ्या लेखनावर फक्त मोठ्या पडद्यावरचा चित्रपट राहिला आहे.

अहिल्यानगर आकाशवाणीवरील चिंतन, बालमेळा, रेडिओसिटीवरुन रेडिओ ड्रामा, रेडिओ नगरवरुन कथा, मनन, लेख, सह्याद्री वाहिनीवरील दक्षता मालिकेचे भाग, एकांकिका, नाटकं, कथा, कादंबऱ्या, कविता, गाणी, पथनाट्ये, काही वेबसेरिजचे भाग, ११ शॉर्टफिल्म्स जवळपास ७०० पेक्षा अधिक लघुकथा-लेख.... लेखन होत रहावे हेच अगदी मनापासून वाटतं. कारण मिळालेल्या प्रतिभाशक्तीचा उपयोग इतरांचं भलं होण्यासाठी करतो आहे, केला आहे, ह्यापुढेही करणारंच आहे. माझ्या वरिल साहित्य प्रकारातल्या लेखनाचा हजारो व्यक्तींना लाभ झाला आहे, होत आहे. आपण, आपलं काम प्रामाणिकपणे करत राहायचं. नोंद घेणाऱ्या व्यक्ती असतात. सगळ्यात महत्वाचं म्हणजे लेखनामुळे मला आनंद - समाधान मिळतं. वाचकांचा - रसिकांचा अभिप्राय मिळाला तर कष्टाचं चीज झाल्यामुळे सुख मिळतं. मी लेखन करतो ह्याला चांगलं म्हणणारी आहेत तसं वाईट म्हणणारीही आहेत. कुणी कसं वागावं हे आपण ठरवु शकत नाही पण मी चांगलंच वागणार, लिहिणार हे मनापासून ठरवलं आहे. ज्यांना वाचनाची आवड नाही, त्यांना साहजिकच लेखनाची आवड नसणार. प्रत्येकाची आवड, छंद, व्यक्तीपरत्वे वेगवेगळे आहेत. पण एक मात्र अगदी हक्काने सांगु शकतो माझ्या हातुन कुणाच चांगलं नाही करता आलं तरी चालेल पण कुणाचंही वाईट करणार नाही ही भावना असावीच.

लेखन खरंच कष्टप्रद असतं. अमिताभ बच्चन ह्यांना एकदा प्रश्न विचारला होता की तुमच्या दृष्टीने चित्रपटाचा खरा हिरो कोण ? तेव्हा बीग बी म्हणाले होते की त्या चित्रपटाची कथा (लेखन) हाच खरा हिरो. लेखन हे व्यक्त होण्यासाठीचं सगळ्यात प्रभावी माध्यम आहे. प्रत्येकात साहित्यिक असतोच. तो साहित्यिकच तेव्हा लक्षात येईल जेव्हा वाचायला सुरुवात कराल. माझ्या लेखनामुळे, प्रेरणादायी व्याख्यानामुळे अनेकांना लाभ झाला आहे. अगदी छोट्या पडदा, मोठा पडदा, आर जे, विविध कंपन्यांमध्ये निवड झालेले काही विद्यार्थी, काही 'माणूस' म्हणून चांगले घडताहेत. मला वाटतं माझा जन्म एलआयसीमध्ये नोकरी करण्यासह इतरांचं भलं व्हावं ह्यासाठी झाला आहे. व्याख्यानाचे कधीही मानधन घेतले नाही म्हणून गरजुपर्यंत पोहोचलो आहे. उद्या एखादा विद्यार्थी आय ए एस होईल हेच मोठं मानधन असेल आयुष्यभराचं. तुम्हीही मनापासून वाचा, व्यक्त व्हा. लिहुन व्यक्त होण्यातला आनंद मिळावा. लेखनामुळेच अनेक साहित्यिक, व्याख्याते, विचारवंत, सेलिब्रिटी ह्यांचा सहवास लाभला आहे. लिहुया, व्यक्त होवु, सशक्त समाज घडवूया.

(लेख क्र.५९४)

**- सुनील राऊत**

माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर

मो.९८२२७५८३८३

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### पपई

शरीरात रक्तशुद्धीचे कार्य होते. त्वचा कोरडी व सुरकुतलेली असेल, उन्हामुळे त्वचेवर पुटकुळ्या आल्या असतील व त्यामुळे त्वचेची आग होत असेल, तर पपईचा रस त्वचेवर लावावा. यामुळे सुरकुत्या, दाह नाहीसा होऊन त्वचा नितळ व स्वच्छ होते.

पपईचे बीज किंवा कच्च्या पपईचा रस मासिक पाळीची अनियमितता, कमी स्राव आणि वेदनेसह मासिक रक्तस्राव यावर गुणकारी आहे. कारण पपईच्या रसामुळे उष्णता वाढून गर्भाशयाच्या स्नायूंचे आंकुचन होते आणि अनियमित रक्तस्राव नियमित होतो. पपई या फळापासून जाम, आईस्क्रीम, टुटीफ्रुटी, चॉकलेट्स, जेली, सौंदर्यप्रसाधने असे अनेक प्रकार बनविले जातात. पपईच्या पानांचा रस प्यायल्याने रक्तशुद्ध होऊन शरीरामध्ये रक्तप्रवाह सुधारतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# कामदा एकादशी

चैत्र मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला कामदा एकादशी असे संबोधले जाते. कामदा एकादशीचे दिवशी भगवान श्री विष्णू यांचे उत्तमरीत्या व्रत मानले जाते. ही एकादशी कष्ट दूर करणारी आणि आपल्याला मनासारखे फळ प्राप्त करून देणारी असल्यामुळे शास्त्रामध्ये या एकादशीला कामदा एकादशी या नावाने ओळखली जाते. या एकादशीची कथा आणि महत्त्व भगवान श्रीकृष्णाने पांडू पुत्र धर्मराज युधिष्ठिर यांना सांगितले होते. हे हिंदू नववर्षामधील पहिले व्रत असून यांनी मोक्ष आणि धनलाभ मिळतो अशी अध्यात्मात नोंद आहे. या एकादशीच्या व्रताने मनोकामना म्हणजे इच्छा पूर्तता होतात म्हणून या एकादशीला एक आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. कामदा एकादशी चे दिवशी भगवान श्री विष्णू आणि महालक्ष्मी यांची विधीव्रत पुजा केल्याने आर्थिक समृद्धी प्राप्त होते. माता लक्ष्मीची आपल्यावर कृपा होते व धन, धान्य यांची समृद्धी होते.



या एकादशीच्या व्रताने सर्व प्रकारच्या पापांचा विशेषता: अजाणतेपणे झालेल्या चुकींचा आणि दुःखांचा नाश होतो असे शास्त्र सांगते. या एकादशीच्या बाबतीत जर पौराणिक अभ्यास आपण केला तर असे आढळून येते या व्रतामुळे राक्षस योनी पासून मुक्ती मिळाल्याची कथा प्रचलित आहे, जी या व्रताचे मोठे पुण्य अधोरेखित करते. कामदा एकादशीचे व्रत केल्याने विधिवत पूजा अर्चना केल्याने मनाला खूप मोठी शांती प्राप्त होऊन पुण्य प्राप्त होते. आपल्या जीवनामध्ये जगातील कितीही मौल्यवान वस्तू धन, दौलत, असु दे परंतु या भौतिक सुखापेक्षा आंतरिक मानसिक सुख शांती देणारे एकमेव माध्यम म्हणजे ईश्वरीय चिंतन, नाम स्मरण व भगवंताची भक्ती हे होय. यांतच खरे अर्थाने जीवनाचे सार दडलेले आहे. एकदा भगवान महाविष्णू व माता महालक्ष्मी या दोघांचा संवाद चाललेला होता आणि हा संवाद चालू असतानाच भगवान श्री विष्णू यांनी एक वस्तू आपल्या पायाखाली लपवली मात्र चर्चा चालू असताना माता महालक्ष्मीच्या हे लक्षात आले व महालक्ष्मी माता ने भगवान श्री विष्णू यांना विचारले हे स्वामी आपली चर्चा चालू असताना आपण आपल्या पायाखाली काय लपवले आहे तेव्हा भगवान श्री विष्णू यांनी अतिशय समर्पक व मार्मिक उत्तर दिले ते म्हणाले या भूतलावर मानवाने कितीही अमर्याद प्रगती करू दे कितीही भौतिक वस्तू सुख समृद्धी निर्माण करू दे परंतु खऱ्या अर्थाने मनशांती व खरे मानसिक सुख शांती समृद्धी आनंद ही जेव्हा मानव माझ्या चरणाशी लीन होईल तेव्हा मी त्याला ही वस्तू देईल की जीचे नाव होते मनःशांती म्हणून ईश्वराच्या चरणी आपण आपले जीवन समर्पित केले ईश्वराचे चिंतन स्मरण केले भजन केले तर आपल्याला खऱ्या अर्थाने मानसिक सुख शांती समाधान आणि आनंद प्राप्त होतो याची प्रचिती आजही आपल्याला येते.

सध्या डिजिटल युग आलेले आहे यंत्र आले तंत्र आले प्रगती झाली अमर्याद स्वरूपात मानवाने प्रगती केलेली आहे परंतु हे सर्व काही करत असताना मानव आपल्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने मनशांती किंवा मानसिक सुख समृद्धी शांती ही लोप पावलेले आपल्याला दिसून येते मग कुठे आहे मनशांती तर आज आपल्याला अध्यात्मप्रवृत्तीमध्ये आपण आपले जीवन जेव्हा समर्पित करतो, ईश्वराचे चिंतन करतो स्मरण करतो भजन करतो तेव्हा आपल्याला खऱ्या अर्थाने मनशांती सुख समाधान प्राप्त झाल्याची प्रचिती येते. याकरिता सैरावैरा धावण्याची गरज नाही म्हणून तर संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

कैसोनी दैवत प्रसन्न त्वरित
उगा राहे निवांत शिनसी वाया ।।

माऊली म्हणतात भगवंताच्या प्राप्तीसाठी सैरावैरा इतरत्र कुठेही जाऊ नका तुम्ही जिथे आहात तिथे ईश्वराचे चिंतन करा स्मरण करा ईश्वराचे चिंतन आणि स्मरण केल्याने आपल्याला ईश्वर प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही. आणि मग २८ अभंगाचा हरिपाठ यामध्ये हरिनामाचे महत्त्व माउलींनी स्पष्ट केले आहे राम कृष्ण हरी हा मौलिक मंत्र सर्वांना दिला की ज्याने पराकोटीचे पुण्य प्राप्त करता येते. आजच्या या पावन पर्वाला अनुसरून कामदा एकादशीचे महत्व व हरिनामाचे चिंतन स्मरण व भक्ती याचे महत्त्व या प्रसंगाच्या औचित्य साधून विशद करावेसे वाटले.

जय राम कृष्ण हरी माऊली

**– दत्तात्रय वारकड,**
लेखक व प्रेरणादायी वक्ते, अहिल्यानगर

# प्रेरणादायी अक्षरधन

## तुका झालासे कळस

संत परंपरेचे एक सुंदर रूपक संत कवयित्री बहिणाबाईने वर्णिले आहे.

'संतकृपा झाली। इमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया ।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।'

'ज्ञानदेवे रचिला पाया' आणि 'तुका झालासे कळस' यात संपूर्ण भागवतधर्मीय संतपरंपरा उभी राहाते. ज्ञानदेवांनी भक्तिमंदिराचा पाया घातला. भागवत धर्माचा, त्यातील तत्त्वचिंतनाचा, महाराष्ट्र सारस्वताचा आणि सामाजिक तत्त्वचिंतनाचाही पाया घातला आणि तुकोबाराय त्याचे कळस झाले. प्रपंच करीत असताना परमार्थाच्या उत्तुंग अवस्थेवर जाणे आणि प्रपंचाचा परमार्थ होणे हाच भक्तिमार्गातील कळस आहे. कळस उंच असतो, तो चकाकत असतो आणि कुठूनही सहजपणे दिसतो.

तुकोबारायांची अभंगवाणी उत्कट भावदर्शनाने कळसासारखी उंचावते. विचारतत्त्वाने कळसासारखी चकाकते आणि सहज सुलभतेने सर्वांना दृग्गोचर होते. मग 'तुका झालासे कळस' या बहिणाबाईंच्या वचनाची साक्ष पटते. ज्ञानदेवांनी मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून वारकरी संप्रदायातील साध्या भोळ्या भक्तिला म्हटले.

आध्यात्मनिष्ठ वैश्विक मानवतावादाची बैठक मिळवून दिली आणि तुकोबारायांनी आपल्या अभंगवाणीने तो वैश्विक मानवतावाद पुन्हा जगाला सांगितला. तुकोबारायांनी अंतर्मुखवृत्ती, कठोर आत्मपरीक्षण अनुभूतीचे सूक्ष्म अवलोकन यामुळे त्यांच्या प्रत्येक शब्दाला श्रेष्ठ कवित्वाची उंची प्राप्त झाली. प्रत्येक शब्दच अभंग झाला. आपल्या वाणीला वाङ्मयीन लोकधनाच्या पातळीवर नेण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीला लाभले. ज्ञानदेव म्हणजे सारस्वताचा शब्दसूर्य तर तुकोबाराय म्हणजे सारस्वताच्या प्रांगणी अमृततत्त्वाचा वर्षाव करणारा पौर्णिमेचा पूर्णचंद्र होय. त्यांच्या अभंगवाणीने सारस्वताला पूर्णत्वाची नित्य पौर्णिमा लाभली. तुकोबारायांना समजून घेण्यासाठी ज्ञानदेवांचाच एक दृष्टांत उपयुक्त ठरेल.

'चंदनाते कायसेनि चर्चावे ।
अमृताते केऊते रांधावे।
गगनावरी उभवावे। घडे केवी ।।

चंदनाला कशाचा लेप द्यावा म्हणजे त्याच्या शीतल अमृतत्त्वाचा स्पर्श होईल? अमृताला कशाने रांधावे म्हणजे त्याची गोडी चाखता येईल? आकाशाला कशाचा मंडप घालावा म्हणजे त्याच्या उत्तुंगतेची अनुभूती येईल? हे जितके अवघड आहे तितकेच तुकोबारायांना शब्दात मांडणेही अवघड आहे. केवळ प्रवृत्तीवादाच्या चिंतनातून तुकोबाराय समजणार नाहीत तर केवळ निवृत्तीवादाच्या चिंतनातूनही त्यांचे व्यक्तित्व परिपूर्ण उमगले असे म्हणता येणार नाही. पारमार्थिकांना, सांप्रदायिकांना ते निवृत्तीवादाने भावतील तर सामाजिक तत्त्वचिंतकांना त्यांचे प्रवृत्तीवादी दर्शन आवडेल. प्रवृत्ती व निवृत्तीचा समन्वय हेच खरे 'तुकोबादर्शन' होय. **– किशोर गांधी**

# पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी डॉ. योग्यता पठारे यांना जाहीर

नगर – योग्यता संदीप पठारे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेची (फार्मास्यूटिक्स) पीएच. डी. पदवी नुकतीच जाहीर झाली आहे.



Development and Characterization of Nanoparticles loaded Ophthalmic Drug Delivery Systems हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांचे या संशोधनात एक भारतीय पेटंट मंजूर झाले आहे, तसेच या संशोधनात ३ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिध्द झाले आहेत. त्यांनी पाच वेगवेगळ्या राष्ट्रीय अधिवेशनात या विषयातील संशोधनवर रिसर्च पेपर प्रेझेंटेशन केले आहे. त्यांना प्रा. डॉ. मनोज सुधाकर तारे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. योग्यता संदीप पठारे या सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव बुद्रुक, पुणे या महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत.

# मार्केटिंग मॅनेजमेंट विषयात प्रा. गोकुळ सोनवणे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**स्टार हॉटेल्सच्या अभ्यासावर आधारित संशोधन**

नगर – जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, अहिल्यानगर येथील प्रा. गोकुळ त्र्यंबक सोनवणे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने मार्केटिंग मॅनेजमेंट या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने मार्केटिंग मॅनेजमेंट या विषयात प्रा. गोकुळ सोनवणे यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आदी.

प्रा. सोनवणे यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय ग्राहकांच्या वर्तनावर विपणन धोरणांचा प्रभाव : पुणे जिल्ह्यातील स्टार हॉटेल्सचा अभ्यास असा असून, त्यांनी आधुनिक विपणन तंत्रज्ञान, ग्राहकांची मानसिकता, सेवा क्षेत्रातील स्पर्धा आणि ग्राहक समाधान यांचा सखोल अभ्यास या प्रबंधातून मांडला आहे. विशेषतः हॉटेल उद्योगातील बदलते ट्रेंड, डिजिटल मार्केटिंगचा प्रभाव आणि ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये झालेला बदल यांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे.



त्यांच्या संशोधनामुळे हॉटेल आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांना ग्राहकाभिमुख धोरणे आखण्यास दिशा मिळणार असून, पर्यटन व आतिथ्य व्यवसायाच्या प्रगतीसाठी हा अभ्यास उपयुक्त ठरणार असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठीही हा प्रबंध मार्गदर्शक ठरणार आहे.

प्रा. सोनवणे यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पा., सहसचिव मुकेश मुळे तसेच खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन व शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपल्या भाषणात प्रा. सोनवणे यांच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे कौतुक करत, संस्थेतील इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. नंदकुमार जगताप यांनी प्रा. सोनवणे यांच्या संशोधनामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावली असल्याचे सांगितले.

प्राचार्या योगिता सदरे यांनी त्यांच्या यशाचे स्वागत करत, भविष्यातही अशाच प्रकारे नावीन्यपूर्ण संशोधन घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या प्रसंगी विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब शेंडगे, प्रा. रचना खटावकर, प्रा. वाहिद मणियार, प्रा. सागर माळवदे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# संत राजिंदर सिंहजी महाराजांच्या दर्शन व प्रवचनाची तयारी अंतिम टप्प्यात



अहिल्यानगरमध्ये ३१ मार्च व १ एप्रिल रोजी होणाऱ्या संत राजिंदर सिंहजी महाराज यांच्या दर्शन व प्रवचनाची तयारी पुर्त्वास आली असून या सोहळ्यासाठी अत्याधुनिक जर्मन हँगर पद्धतीचा वॉटर प्रुफ २०० फुट बाय ५०० फुटाचा भव्य मंडप उभारण्यात आला आहे.

**मिस्कीननगर येथे ३१ मार्च व १ एप्रिल रोजी आयोजन**

नगर – विश्वविख्यात अध्यात्मिक संतसद्गुरू आणि सावन कृपाल रूहानी मिशनचे प्रमुख संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे अहिल्यानगरमध्ये आगमन होत आहे. यानिमित्ताने आयोजित सोहळ्यात ३१ मार्चला महाराजांच्या दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून १ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महाराजांचे प्रवचन होणार आहे. या सोहळ्यासाठी तारकपूरच्या मिस्कीननगर येथील गंगा उद्यानाजवळील १० एकर मैदानात अत्याधुनिक जर्मन हँगर पद्धतीचा वॉटर प्रुफ २०० फुट बाय ५०० फुटाचा मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात हजारो भाविकांची आसन व्यवस्था करण्यात अली आहे. या सोहळ्यासाठी देशातील सर्व राज्यातून तसेच विविध परदेशांमधूनही भाविक उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे, अशी माहिती कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया यांनी दिली.

अधिक महिती देताना सुनील मिस्कीन म्हणाले, या भव्य दिव्य सोहळ्यासाठी उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात ज्येष्ठ नागरिकांसाठी खुर्च्यांची व्यवस्था केली असून इतर भाविकांसाठी भारतीय बैठकीची व्यवस्था आहे. मंडपात लाईट, स्पीकर व ठिकठिकाणी एलईडी वॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच तातडीच्या वैद्यकीय उपचार, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन याचबरोबर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह व्यवस्थेसह इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भाविकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सुटसुटीत व्यवस्था जवळच करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेकडो स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे सहकार्य करत आहेत.

कृपाल आश्रमचे सचिव सुशील बजाज यांनी सांगितले, संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे ९ वर्षांनी अहिल्यानगरमध्ये आगमन होत असल्याने सर्व भाविकांना मोठा आनंद झाला आहे. या निमित्ताने होणाऱ्या या सोहळ्याची तयारी पूर्णात्वास आली आहे. याठिकाणी दोन्ही दिवस भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी स्वतंत्र मोठ्या मंडपाची व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी छोटे तंबू उभारण्यात आले असून त्यामध्ये विविध धार्मिक साहित्यांचे प्रदर्शन होणार आहे.

नगर शहरासह जिल्ह्यातील भाविकांनी या आध्यात्मिक पर्वणीचा व प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सावन कृपाल आश्रमचे महाराष्ट्र विभाग प्रमुख महेश अंबवाणी यांनी केले आहे.

# बसपाच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी सुनील ओहोळ तर उत्तर जिल्हाध्यक्षपदी सुरेश कांबळे यांची नियुक्ती

**अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर; राहुरी पोटनिवडणूक व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी चर्चा**

नगर – बहुजन समाज पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक शहरात पार पडली. बसपाचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. सुनील डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नवीन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. आगामी जिल्हा परिषद निवडणुका व राहुरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेऊन पुढील रणनीती निश्चित करण्यात आली.



बहुजन समाज पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक शहरात पार पडली. बसपाचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. सुनील डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नवीन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या बैठकीस पुणे–खानदेश विभागाचे मुख्य झोन प्रभारी रामचंद्र जाधव आणि राज चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. सुनील डोंगरे यांनी जिल्हा कार्यकारिणी जाहीर करताना दक्षिण अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सुनील ओहोळ यांची नियुक्ती केली. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून शहानवाज शेख यांची निवड करण्यात आली. जिल्हा महासचिवपदी राजू शिंदे यांची फेरनिवड करण्यात आली. तसेच उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सुरेश कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली. अहिल्यानगर विधानसभा अध्यक्षपदी निलेश घोडके तर श्रीगोंदा विधानसभा अध्यक्षपदी त्रिंबक साळवे यांची निवड जाहीर करण्यात आली.

## श्रीपाद छिंदम यांचा यावेळी विशेष सत्कार

महापालिका निवडणुकीत नगरसेवक म्हणून विजयी ठरलेल्या श्रीपाद छिंदम यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करत पक्षाने आगामी निवडणुकांमध्ये अधिक जोमाने काम करण्याचे संकेत दिले. बैठकीदरम्यान प्रत्येक गावात बसपाची शाखा स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

अ‍ॅड. सुनील डोंगरे म्हणाले की, बहुजन समाज पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुका आपल्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याने गावागावात जाऊन पक्षाची विचारधारा पोहोचवावी. 'गाव तिथे शाखा' हा संकल्प केवळ घोषणा न राहता कृतीत उतरला पाहिजे. संघटन मजबूत असेल तर कोणतीही निवडणूक जिंकणे कठीण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रामचंद्र जाधव यांनी पुणे–खानदेश विभागात बसपाची ताकद वाढत आहे. अहिल्यानगर जिल्हा हा संघटनदृष्ट्या महत्त्वाचा आहे. येथे कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केल्यास येणाऱ्या निवडणुकांमध्ये चांगले यश मिळू शकते. युवकांना मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

राज चव्हाण म्हणाले की, आजच्या बैठकीत घेतलेले निर्णय भविष्यातील यशाचा पाया ठरतील. संघटनशक्ती आणि शिस्त या दोन गोष्टींवर पक्ष उभा आहे. प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्याने जबाबदारीने काम केल्यास बसपा निश्चितच जिल्ह्यात मजबूत पर्याय ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्ष सुनील ओहोळ म्हणाले की, आपल्यावर दिलेली जबाबदारी ही मोठी आहे. सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटन वाढवणे आणि प्रत्येक गावात पक्षाची शाखा उभी करणे, हे आपले उद्दिष्ट असेल. येणाऱ्या निवडणुकांमध्ये बसपाचा झेंडा उंचावण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीस भाईचारा कमिटीचे जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, प्रा. भांबळ मॅडम, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाला, राहुरी विधानसभा अध्यक्ष संजय संसारे, सलीम अत्तार, राजू खरात, प्रकाश अहिरे, सुनील मगर, चंद्रकांत दोंदे, अशोक तांबे, चंद्रकांत दोंदे, गणेश बागल, श्याम औटी, दत्तू गिरी, दत्तात्रय सोनवणे, महादेव त्रिभूवन, रोहित खरात, सोनवणे मॅडम आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुरेश कांबळे यांनी केले. सुनील ओहोळ यांनी आभार मानले.



कांकरिया करंडक दुसरे बालपण आणि काव्य कट्टाच्या वतीने जागतिक रंगभूमी दिनी नटराज पूजन करताना डॉ. सुधा कांकरिया आदी.

# कांकरिया करंडक, दुसरे बालपण व काव्य कट्टाच्यावतीने जागतिक रंगभूमी दिन उत्साहाने साजरा, नटराज पुजन

नगर – येथील मानकन्हैय्या ट्रस्ट संचलित कांकरिया करंडक, दुसरे बालपण आणि काव्य कट्टा या सांस्कृतिक समितीच्या वतीने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त नटराज पुजन करण्यात आले, अशी माहिती कार्याध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली. सदर प्रसंगी नाटय परिषद अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, अखिल भारतीय मराठी नाटयपरिषदेचे कोषाध्यक्ष सतिश लोटके, ज्येष्ठ रंगकर्मी पी डी कुलकर्णी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त चित्रकार नंदकुमार देशपांडे, सदाशिव मोहिते, ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.प्रकाश कांकरिया उपस्थित होते.

प्रसाद बेडेकर म्हणाले की, लहानग्यांसाठी कांकरिया करंडक ज्येष्ठ नागरिकांसाठी दुसरे बालपण व साहित्य–नृत्य क्षेत्रातील कलाकारांसाठी काव्य कट्टा अशा विविध प्रकारे मानकन्हैय्या ट्रस्ट कार्य करीत आहे. त्यामुळे अहिल्यानगरच्या सांस्कृतिक वैभवात भर पडत आहे.

सतिश लोटके म्हणाले की, डॉ. सुधा आणि डॉ. प्रकाश कांकरिया यांचा उत्साह कलाकारांना प्रेरणा देऊन जातो असे सांगुन त्यांनी जागतिक रंगभूमी दिनाचे महत्व विषद केले. हा रंगमंच समाजाच्या स्थितंतराचे प्रतिक आहे. अनेक प्रकारच्या कला, नृत्य–नाटय, गीत–संगीत या सर्वांची मेजवानी रंगभूमी व्दारेच प्राप्त होत असते.

ज्येष्ठ रंगकर्मी पी डी कुलकर्णी म्हणाले की, कला माणसाला जगण्याचे बळ देते. विविध प्रकारच्या कलेचे सादरीकरण याच रंगमंचावर होत असते. कला व कलाकारांचाही संवाद येथेच होतो.

सुरूवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले. त्या म्हणाल्या १९६२ साली पहिल्यांदा जागतिक रंगभूमी दिन साजरा झाला. सांस्कृतिक वारसा आणि परंपरा जपण्याचे कार्य हयाच रंगभूमीवरून होते तसेच सामाजिक–राष्ट्रीय समस्या मांडण्याचे ही हे एक उत्तम माध्यम आहे. सामाजिक परिवर्तनाचे हे एक प्रभावी साधनही आहे. आजचा दिवस नटराज पुजनाने आपण साजरा करीत आहोत. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले.




# कर्करोगाचा धोका ओळखण्यासाठी ॲप

कर्करोगाची वाढती रुग्णसंख्या आणि मर्यादित वैद्यकीय संसाधनांच्या पार्श्वभूमीवर, कर्करोगाचा धोका आधीच ओळखण्यासाठी टाटा रुग्णालयातील संशोधकांनी एक नवे मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपमध्ये एखाद्या व्यक्तीला कर्करोगाचा धोका सरासरीपेक्षा कमी किंवा जास्त आहे, याची माहिती मिळणार आहे. विशेषतः स्तनाच्या कर्करोगाच्या जोखमीचे मूल्यांकन करून अधिक धोका असलेल्या महिलांची वेळेत तपासणी करता येणे शक्य होणार आहे. या ॲपच्या माध्यमातून विविध जोखीम घटकांच्या आधारे एखाद्या व्यक्तीला कर्करोग होण्याची शक्यता मोजण्यासाठी सांख्यिकीय मॉडेलचा वापर करण्यात येणार आहे. हे ॲप या वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत लॉन्च होणे अपेक्षित आहे.




ॲपमध्ये वापरकर्त्याचे वय, बॉडी मास इंडेक्स, मुलांची संख्या, रजोनिवृत्तीची स्थिती, कंबर-नितंब प्रमाण तसेच जीवनशैलीशी संबंधित काही माहिती भरावी लागेल. या माहितीच्या आधारे, सरासरी लोकसंख्येच्या तुलनेत संबंधित व्यक्तीला कर्करोगाचा धोका किती अधिक किंवा कमी आहे, हे ॲपच्या माध्यमातून दाखवले जाईल. भविष्यात या ॲपमध्ये आनुवंशिक जोखीम तपासणीची माहितीही समाविष्ट करण्याचा विचार आहे. त्यासाठी व्यक्तींना रक्ततपासणी करावी लागेल. आनुवंशिक जोखीम अधिक आढळल्यास, हे मॉडेल अधिक अचूकपणे धोका सांगेल. स्तनाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग, पित्ताशयाचा कर्करोग या तीन प्रकारच्या कर्करोगांसाठी या ॲपचा वापर करण्यात येणार आहे.

टेक्नॉलॉजी

# यकृताची लक्षणे हातात?

लिव्हर (यकृत) शांतपणे दररोज आपल्या शरीरातील शेकडो महत्त्वाची कामे करत असते. ते रक्ताचे डिटॉक्सिफिकेशन करते, पचनक्रियेला मदत करते आणि शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते; मात्र, लिव्हरमध्ये काही समस्या सुरू होते तेव्हा ती नेहमी तीव्र लक्षणांच्या स्वरूपात दिसून येत नाही. अनेकदा त्याचे सुरुवातीचे संकेत आपल्या हातांमध्येच दिसू लागतात.



'जर्नल ऑफ क्लिनिकल अँड एक्सपेरिमेंटल हेपॅटोलॉजी'नुसार, हातांच्या त्वचेचा रंग बदलणे, तळहात लाल होणे, नखांचा रंग फिकट पडणे, बोटे थरथरणे किंवा सतत खाज येणे यांसारखी लक्षणे लिव्हरशी संबंधित समस्यांकडे संकेत देऊ शकतात. फॅटी लिव्हर, हेपॅटायटिस किंवा सिरोसिस यांसारख्या आजारांमध्ये अशी लक्षणे हळूहळू दिसू लागतात. वेळेवर या संकेतांची ओळख झाली, तर गंभीर अडचणी टाळता येऊ शकतात.

आरोग्य चर्चा

**तळहात लाल होणे**

तळहात, विशेषतः अंगठा आणि करंगळीच्या आसपासचा भाग असामान्यपणे लाल दिसत असेल, तर त्याला 'पामर एरिथेमा' असे म्हणतात. हे सहसा तेव्हा दिसते, जेव्हा लिव्हर योग्य प्रकारे कार्य करत नाही आणि शरीरात इस्ट्रोजेन हार्मोनचे प्रमाण वाढते. तथापि, काही वेळा हे निरोगी व्यक्तींमध्येही दिसू शकते; पण त्यासोबत थकवा किंवा कावीळ यांसारखी लक्षणे दिसत असतील, तर डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे..

**बोटे वाकणे**

काही लोकांमध्ये तळहाताखालची त्वचा हळूहळू जाड होऊन बोटांना आतल्या बाजूला वाकवू लागते. या अवस्थेला ड्यूपिट्रेन कॉन्ट्रॅक्चर असे म्हणतात. ही समस्या दीर्घकाळ चालणाऱ्या लिव्हरच्या आजाराशी किंवा जास्त प्रमाणात मद्यपानाशी संबंधित असू शकते.

**टेरीज नेल्स**

नखे जवळजवळ पूर्णपणे पांढरी दिसत असतील आणि त्यांच्या कडेला हलकी गुलाबी पट्टी दिसत असेल, तर ते टेरीज नेल्सचे लक्षण असू शकते. हे बहुतेकदा लिव्हर सिरोसिसमुळे रक्तप्रवाह आणि प्रोटीनच्या पातळीत झालेल्या बदलांमुळे दिसून येते.

**नखांची उभारी वाढणे**

कधी कधी बोटांच्या टोकांचा भाग गोलसर दिसू लागतो. या स्थितीला 'नेल क्लबिंग' असे म्हणतात. साधारणपणे हे फुफ्फुस आणि हृदयाच्या आजारांशी संबंधित असते; परंतु दीर्घकाळ चालणाऱ्या लिव्हरच्या आजारांमध्येही ते दिसू शकते.

**हात थरथरणे**

हात पुढे केल्यावर मनगट किंवा बोटांमध्ये अचानक झटका बसल्यासारखी हालचाल होत असेल तर त्याला एस्टेरिक्सिस असे म्हणतात. हे लिव्हरच्या गंभीर अवस्थेचे संकेत असू शकतात. त्यात शरीरात साचलेले विषारी पदार्थ मेंदूवर परिणाम करू लागतात.

**तळहातांमध्ये खाज**

तळहात आणि पायांच्या तळव्यांमध्ये पुरळ नसतानाही सतत खाज येणे हेदेखील लिव्हरच्या समस्येचे लक्षण असू शकते. शरीरात पित्ताचा प्रवाह नीट होत नाही तेव्हा असे होते. तज्ज्ञांच्या मते, हातांमध्ये असे बदल दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. योग्य वेळी तपासणी आणि उपचार केल्यास लिव्हरशी संबंधित गंभीर आजार टाळता येतात आणि एकूण आरोग्य अधिक चांगले राखता येते.

# महिलांमध्ये मायग्रेन अधिक


डोकेदुखी हा अनेकांना होणारा साधा त्रास वाटू शकतो; पण काही महिलांसाठी ही वेदना इतकी तीव्र असते, की रोजचं काम, ऑफिसची जबाबदारी आणि घरची कामं करणंही कठीण होतं. काही वेळा प्रकाश, आवाज किंवा ताण वाढला, की डोकं ठणकायला लागतं आणि संपूर्ण दिवसच बिघडून जातो.

तज्ज्ञांच्या मते, महिलांमध्ये मायग्रेनचा त्रास पुरुषांच्या तुलनेत जास्त आढळतो. मासिक पाळीच्या काळात होणारे हार्मोनल बदल, कामाचा ताण, झोपेची कमतरता आणि वाढलेला 'स्क्रीन 'टाइम यांसारख्या अनेक गोष्टी यामागे कारणीभूत ठरतात. त्यामुळे आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत महिलांमध्ये मायग्रेनचा धोका वाढल्याचं दिसत आहे. महिलांच्या शरीरात इस्ट्रोजेन नावाच्या हार्मोनमध्ये वेळोवेळी बदल होत असतात. हे बदल मासिक पाळी, प्रेग्नन्सी आणि रजोनिवृत्तीच्या काळात अधिक दिसून येतात. या बदलांचा मेंदूतील रसायनांवर आणि रक्तवाहिन्यांवर परिणाम होऊ शकतो.

अनेक महिलांना पाळीच्या आधी किंवा पाळीच्या काळात डोकेदुखीचा त्रास वाढतो. कारण या काळात 'इस्ट्रोजेन'ची पातळी कमी होते. त्यामुळे मायग्रेनचा अटॅक येण्याची शक्यता वाढते. काही महिलांमध्ये प्रेग्नन्सीदरम्यान किंवा मेनोपॉजच्या काळातही मायग्रेनच्या तीव्रतेत बदल दिसू शकतो.

आजकालची जीवनशैली खूप धावपळीची झाली आहे. त्यामुळे मायग्रेनचा त्रास वाढताना दिसतो. विशेषतः नोकरी, घर आणि इतर जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांवर मानसिक आणि शारीरिक ताण वाढतो. लॅपटॉप, मोबाईल किंवा इतर स्क्रीनसमोर जास्त वेळ बसणं, झोपेची वेळ बिघडणं, वेळेवर जेवण न करणं किंवा पाणी कमी पिणं अशा सवयी डोकेदुखी वाढवू शकतात. एवढंच नाही, तर कामाच्या ठिकाणी असलेला ताण, डेडलाईनचा दबाव आणि सततचा मानसिक थकवा यामुळेही मायग्रेनचा अटॅक येण्याची शक्यता वाढते.

आरोग्यमंत्र



**मायग्रेन होण्याआधी दिसणारी लक्षणे**

*मूड अचानक बदलणे

*जास्त थकवा जाणवणे

*मान कडक किंवा ताणलेली वाटणे

*गोड किंवा काही विशिष्ट पदार्थ खाण्याची इच्छा होणे

*लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे

ही लक्षणे दिसल्यास काय करावे?

*शांत आणि अंधुक ठिकाणी थोडी विश्रांती घ्या

*पुरेसे पाणी प्या

*काही वेळ मोबाईल, टीव्ही किंवा लॅपटॉपपासून दूर राहा

*डोळ्यांना आणि मेंदूला थोडा आराम द्या


मायग्रेन टाळण्यासाठी काय करावे?

तज्ज्ञांच्या मते काही साध्या सवयी अंगीकारल्या, तर मायग्रेनचा त्रास कमी होऊ शकतो. रोज ठराविक वेळी झोपणं आणि उठणं, वेळेवर जेवण करणं आणि पुरेसं पाणी पिणं या सवयी महत्त्वाच्या आहेत. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर कमी करणंही फायदेशीर ठरतं. ताण कमी करण्यासाठी योग, ध्यान, श्वसनाचे व्यायाम किंवा नियमित चालणे यासारख्या गोष्टी मदत करू शकतात.

# उन्हाळ्यात वाढतात किडनीविकार

मार्चपासूनच तापमानाचा पारा वेगाने वाढू लागल्यामुळे देशातील बहुतांश भागांमध्ये आता उष्णतेच्या लाटा जाणवू लागल्या आहेत. आता पुढचे किमान तीन महिने तीव्र उन्हाळा असण्याचा अंदाज आहे. अशा कडक उन्हाळ्यात आरोग्याच्याही अनेक समस्या निर्माण होतात. डिहायड्रेशन आणि हिटस्ट्रोक याबद्दल तर अनेकांना माहीत असते;

मात्र उन्हाळ्यात किडनीसंदर्भातील व्याधीही डोकं वर काढतात. कडक उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता वाढल्यामुळे किडनीच्या विकारांचा धोका वाढतो. डॉक्टरांच्या मते, डिहायड्रेशनमुळे किडनी स्टोन, मूत्रमार्गाचे आजार आणि किडनी डॅमेजची शक्यता वाढू शकते.




किडनी हा आपल्या शरीरातील एक अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. पुरेसे पाणी पिणे आणि रक्त पुरवठाही व्यवस्थित असणे हे सुदृढ किडनीसाठी गरजेचे असते; पण उष्णतेची लाट तीव्र असेल तर नेमक्या याच दोन घटकांवर त्याचा परिणाम होतो. तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाले आणि हवेतील आर्द्रता वाढली, तर शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते. त्यामुळेच उन्हाळ्यात पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे आहे.

व्याधी विकार

गरम हवामानात शरीरात पुरेसे पाणी नसेल, तर रक्तदाबावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यामुळे किडनीला होणारा रक्तपुरवठा कमी झाल्यास आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होतात. ही अशीच परिस्थिती कायम राहिली आणि पुरेसे पाणी न मिळाल्यास किडनीला धोकाही संभवतो. सुदैवाने उष्णतेच्या लाटेमुळे उद्भवणाऱ्या किडनीच्या बहुतांश समस्यांवर वेळेत प्राथमिक उपचार करता येणे शक्य असते; मात्र अशा समस्या वारंवार उद्भवल्यास किडनीवर त्याचा दूरगामी परिणाम होऊ शकतो. अलीकडच्या काळात राजस्थान, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, दिल्ली आणि उत्तर प्रदेशमधील काही भागांत उष्णतेच्या तीव्र लाटा येत असल्याचा अनुभव आहे. अशा वेळी शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील मजूर, वाहतूक पोलिस, रस्त्यांवर विक्री करणारे यांना अशा किडनीच्या विकाराचा जास्त धोका असतो. उष्णतेच्या लाटेमध्ये उद्भवणाऱ्या किडनीच्या समस्या वेळीच ओळखल्या तर त्यावर उपाय करता येऊ शकतो. मूत्रविसर्जनास होणारा त्रास, सतत घशाला कोरड पडणे, दमछाक होणे, स्नायू आखडणे अशी काही लक्षणे असल्यास तातडीने त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. दिवसभरात शरीरात पाण्याचे प्रमाण पुरेसे असेल, याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. विशेषत: खूप घाम येत असेल, तर हे अत्यंत गरजेचे आहे. ज्या भागांमध्ये उष्णतेची लाट असेल, तिथे शक्यतो दुपारच्या वेळी उन्हात जाणे टाळावे. उन्हात काम करणे आवश्यक असेल, तर ठराविक कालावधीनंतर सावलीमध्ये विश्रांती घ्यायला हवी.

# स्थूलतेमुळे जडतात विकार



भारतात स्थूलतेची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. जास्त वजन असलेल्या अनेक व्यक्तींना स्वतः ठणठणीत असल्याचे वाटते; मात्र शरीरातील अतिरिक्त चरबी हृदय, यकृत (लिव्हर) आणि स्वादुपिंड (पॅनक्रियास) यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करू शकते. मधुमेह, वाढलेले कोलेस्ट्रॉल, थायरॉईड असंतुलन आणि व्हिटॅमिनची कमतरता हे आजार सुरुवातीच्या टप्प्यात स्पष्ट लक्षणांशिवाय विकसित होऊ शकतात.

जास्त वजनामुळे मधुमेह, हृदयविकार, फॅटी लिव्हर आणि हार्मोनल असंतुलन यांचा धोका वाढतो. नियमित हेल्थ चेक-अप केल्याने आजार लवकर ओळखता येतात आणि गंभीर गुंतागुंत टाळता येते. त्यामुळे तुमचे वजन जास्त असेल किंवा तुम्ही स्थूल असाल तर तज्ज्ञांच्या संपर्कात राहणे आणि त्यांच्या मार्गदर्शनाचे योग्य पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. खालील महत्त्वाच्या टिप्सनुसार स्थूलतेवर वेळीच नियंत्रण मिळवणे गरजेचे आहे. म्हणूनच जास्त वजन असलेल्या व्यक्तींनी आपल्या आरोग्याबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे. नियमित रक्त तपासण्या केल्याने स्थूलतेमुळे निर्माण होणाऱ्या लपलेल्या समस्या ओळखता येतात आणि त्यावर वेळेवर उपचार करता येतात.

एचबी ए १ सी (रक्तातील साखरेची तपासणी): ही तपासणी मागील तीन महिन्यांतील सरासरी रक्तातील साखरेचे प्रमाण दर्शवते. जास्त वजन असलेल्या व्यक्तींमध्ये इन्सुलिन रेसिस्टन्स आणि टाइप २ मधुमेहाचा धोका जास्त असतो. एचबी ए १ सी वाढलेले असल्यास लक्षणे दिसण्यापूर्वीच प्रीडायबेटीस किंवा मधुमेहाची शक्यता कळू शकते. त्यामुळे दर सहा महिन्यांनी ही तपासणी करणे योग्य ठरते.

लिपिड प्रोफाइल: या तपासणीत एलडीएल (वाईट कोलेस्ट्रॉल), एचडीएल (चांगले कोलेस्ट्रॉल) आणि ट्रायग्लिसराइड्सचे प्रमाण तपासले जाते. स्थूलतेमुळे वाईट कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्स वाढतात. त्यामुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका निर्माण होतो.

व्याधी विचार

लिव्हर फंक्शन टेस्ट (एलएफटी): जास्त वजनामुळे फॅटी लिव्हरचा धोका वाढतो. 'एलएफटी' द्वारे यकृताचे आरोग्य तपासता येते आणि चरबी साचल्यामुळे होणारे सुरुवातीचे नुकसान ओळखता येते.

थायरॉईड फंक्शन टेस्ट: थायरॉईड हार्मोन्स शरीरातील मेटाबॉलिझम नियंत्रित करतात. थायरॉईड कमी कार्यरत असल्यास (हायपोथायरॉईडीझम) वजन वाढणे, थकवा आणि मेटाबॉलिझम मंदावणे अशी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे थायरॉईड तपासणी नियमितपणे करणे आवश्यक आहे.

व्हिटॅमिन डी पातळी: जास्त वजन असलेल्या व्यक्तींमध्ये व्हिटॅमिन डी ची कमतरता आढळते. यामुळे सांधे आणि स्नायूंमध्ये वेदना होऊ शकतात व मानसिक ताण वाढू शकतो.

काय काळजी घ्याल?

*स्थूलतेकडे दुर्लक्ष करू नका. वेळीच योग्य पावले उचला.

*नियमित तपासण्यांसोबतच ताज्या फळे आणि भाज्यांनी समृद्ध पौष्टिक आहार घ्या,

*गरज असल्यास व्हिटॅमिन डी सप्लिमेंट घ्या, पुरेशी झोप घ्या आणि दररोज व्यायाम करा.

*वजन कमी करण्यासाठी आणि स्थूलतेवर नियंत्रण मिळवण्यासाठी सातत्य महत्त्वाचे आहे.

*वेळेवर तपासणी, योग्य आहार आणि नियमित व्यायाम यामुळे मोठे आजार टाळता येतात.

*आपले आरोग्य हीच खरी संपत्ती आहे त्याची काळजी घ्या.

# मध्यरात्री भूक लागते?



रात्री झोपण्याच्या किमान दोन तास आधी जेवावं, असा सल्ला नेहमीच दिला जातो. मात्र काम किंवा इतर कारणामुळे होणारं जागरण, लवकर जेवणं यामुळे रात्री उशिरा भूक लागू शकते. अशा वेळी वेफर्स, चॉकलेट्स, आईस्क्रीमसारखे अनारोग्यदायी पदार्थ खाल्ले जातात. मात्र रात्री भूक लागल्यानंतर खाता येणारे काही आरोग्यदायी पदार्थही आहेत. अशा पदार्थांमुळे तुमच्या कॅलरीही वाढणार नाहीत आणि रात्री त्रासही होणार नाही. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.

तुम्ही मध्यरात्री विविध प्रकारच्या बिया आणि सुका मेवा हे मिश्रण खाता येईल. यात भरपूर पोषणमूल्य असतात. मात्र हे पदार्थ मर्यादित प्रमाणात खायला हवेत. रात्रीच्या वेळी उकडलेलं अंडंही चालून जाईल. एका मध्यम आकाराच्या उकडलेल्या अंड्यात फक्त ७८ कॅलरी असतात. तसंच अंडं हा प्रथिनांचाही स्रोत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अंडं खाता येईल. फायबरयुक्त ओट्समुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यातल्या पोषणमूल्यांमुळे तुम्हाला छान झोपही लागेल. वेगळा पदार्थ म्हणून तुम्ही पॉपकॉर्नही खाऊ शकता.

लाईफस्टाईल

# योगा करताना चुका टाळा

योगासनांमुळे आरोग्य उत्तम रहायला मदत होत असली तरी ही आसनं योग्य पद्धतीने करणंही गरजेचं असतं कारण योगासनं करताना होणाऱ्या काही चुकांमुळे त्रास होऊ शकतो. त्यातही नवखे असताना बरीच काळजी घ्यावी लागते. नवख्यांनी योगा क्लासमध्ये पहिल्या रांगेत बसण्याऐवजी शक्यतो मागे बसावं. यामुळे योगा प्रशिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष ठेवता येईल. दुसरं म्हणजे क्लासमधल्या इतरांची कृतीही न्याहाळता येईल.



काहीजण श्वास जास्त वेळ रोखून धरतात. पण हे चुकीचं आहे. ३० सेकंदांपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरू नये. श्वास जास्त काळ रोखून धरल्यामुळे शरीरातल्या ऑक्सिजनच्या प्रवाहावर परिणाम होऊन घुसमटल्यासारखं वाटू शकतं. योगा करताना शरीराची स्थिती योग्य असणंही तितकंच गरजेचं आहे.

कुठे चुकतो?


बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योगाचे काहीच लाभ मिळणार नाहीत. शिवाय इतर दुखणी मागे लागू शकतात. अखेरच्या टप्प्यात शवासन केलं जातं. यामुळे योग केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. म्हणूनच शवासन टाळू नये.

महत्त्वाचे म्हणजे भरल्या पोटी योगा करू नये.

# स्मरणशक्ती सुधारायची तर...

स्मरणशक्ती टिकून रहावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण सध्याच्या काळात अनेक कारणांमुळे विस्मरणाचं प्रमाण वाढत चाललं आहे. तल्लख बुद्धीसाठी तसंच स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी काही आयुर्वेदिक औषधी उपयुक्त ठरू शकतात. अशाच काही औषधींविषयी...

आयुर्वेद आणि विकार



*ब्राह्मी हा स्मरणशक्ती सुधारण्याचा रामबाण उपाय आहे. गुणधर्मांमुळे ब्राह्मीवर बरंच संशोधनही झालं आहे. ब्राह्मीच्या सेवनाने मेंदूची क्षमता सुधारते. यासोबतच या औषधामुळे मेंदू ताजातवाना होतो. आपल्याला खूप शांत वाटतं. ताण कमी करण्यासाठीही ब्राह्मीचा वापर करता येईल.

*जिंको नामक आयुर्वेदिक औषधावर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. जिंकोमुळे मज्जासंस्थेचं रक्ताभिसरण सुधारून मेंदूला चालना मिळते. यासोबतच हे औषध शरीरातल्या विविध पेशींना झालेलं नुकसानही भरून काढतं.

*अश्वगंधामुळेही मेंदूची सर्वांगिण कार्यक्षमता वाढते आणि स्मरणशक्तीही सुधारते.

*ज्येष्ठमधही मेंदूच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त औषध आहे. ज्येष्ठमधाच्या सेवनानंतर आपल्याला खूप शांत वाटतं. ताण, चिंता, काळजी अशा मानसिक आजारांवरही ज्येष्ठमध उपयुक्त ठरतो. त्यामुळे ज्येष्ठमधाचं नियमित सेवन करायला हवं.

# मला सभागृहातून बाहेर काढणाऱ्या नगरसेवकांविरोधात न्यायालयात दाद मागणार; अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त यांना प्रतिवादी करणार


श्रीपाद छिंदम

नगर – मी लोकशाही पद्धतीने निवडून आलो आहे. लोकांनी मला मतदानाद्वारे निवडून देऊन महापालिकेच्या सभागृहात लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी पाठविले आहे. लोकांचे प्रश्न मांडत असताना मला बोलू दिले नाही, माझ्या अंगाला हात लावून आणि जीवे मारण्याची धमकी देवून मला सभागृहातून बाहेर काढण्यात आले. यात आयुक्तांनीही केवळ बघ्याची भूमिका घेतली. माझे अधिकार डावलले गेले. त्यामुळे मी त्या नगरसेवकांविरोधात न्यायालयात जाणार आहे. त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी करणार आहे. तसेच यात महापालिका आयुक्त आणि विभागीय आयुक्त यांना प्रतिवादी करणार आहे, असा इशारा महापालिकेचे नगरसेवक व माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी दिला.

२७ मार्च रोजी महापालिकेच्या बजेट विशेष सभेत नगरसेवक श्रीपाद छिंदम यांच्याविरोधात घोषणाबाजी करीत छत्रपती शिवाजी महाराजा यांचा अपमान करणाऱ्यास सभेत बसण्याचा अधिकार नाही, असे सांगत काही नगरसेवकांनी त्यांना सभेतून हाकलून दिले होते. या पार्श्वभूमीवर छिंदम यांनी दैनिक नवा मराठाशी संवाद साधला. ते म्हणाले, २७ मार्च रोजी महापालिकेच्या बजेटची सभा होती. त्यासाठी मला महापालिकेने निमंत्रित केलेले होते. मी दुपारी सुमारे २.१५ ते २.४५ या वेळेत सभागृहात महापालिका आयुक्तांना प्रश्न विचारत असताना अचानक माझ्याविरोधात घोषणाबाजी सुरु झाली. मला बोलण्याचा अधिकार नाही, सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, अशा पद्धतीने मला सुनावण्यात आले. तसेच काही नगरसेवकांनी माझ्या अंगाला हात लावत मला बाहेर काढले आणि बाहेर काढताना मला जीवे मारण्याची धमकीही दिली. या शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या सांगण्यावर त्यांनी हे सर्व केले आहे. माझ्याविरोधात अगोदरच कट रचलेला होता. त्यांच्या आकाचे आदेश आल्यानंतर त्यांनी आपल्या आकाला खूश करण्यासाठी माझ्यावर दादागिरी केली. पद्मशाली समाजाचे नेतृत्व शहरात तयार होऊ द्यायचे नाही, असा त्यांचा डाव आहे, असा आरोप छिंदम यांनी केला.

आयुक्त लाचार आहेत. सत्ताधारी, आमदारांसमोर त्यांचे काही चालत नाही. मी त्यांना सांगत होतो, मला सभागृहात बसण्याचा अधिकार आहे, मला निवडून दिलेल्या जनतेचा तो अधिकार आहे, लोकांचे प्रश्न मांडायला मी आलो आहे. माझ्या प्रश्नाचे त्यांना उत्तर देता आले नाही. म्हणून त्यांनी मला बाहेर काढले. महापालिकेत ऑडिटर नाही, मुख्य लेखाधिकारी नाही. हे दोन्ही मुख्य अधिकारी नसताना तुम्ही कोणाच्या आधारे बजेट सादर केले. या बजेटबाबत अधिकृतपणा काय, याचे उत्तर मी त्यांना मागितले होते. पण त्यांनी मला सभागृहाबाहेर काढले. म्हणून मी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली आहे. वकीलांचा सल्ला घेतला आहे. आता मी त्या सर्व नगरसेवकांविरोधात न्यायालयात जाणार आहे. माझा संवैधानिक अधिकार नाकारणाऱ्यांचे पद रद्द करण्याची मागणी करणार आहे. यात आयुक्त, विभागीय आयुक्तांनाही प्रतिवादी करणार आहे, असे छिंदम म्हणाले.

### ...तर नगरसेवक आणि आमदार जबाबदार : छिंदम

महानगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या गोंधळानंतर नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी गंभीर आरोप करत पोलीस अधिक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे. माझ्या जीवितास काही बरे–वाईट झाले तर त्यास शहराचे आमदार संग्राम जगताप आणि नगरसेवक विकी जगताप, संपत बारस्कर, सुरेश बनसोडे, गणेश भोसले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे आणि अमोल येवले हे जबाबदार असतील. या सर्व नगरसेवकांनी मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यामागे आ. जगताप हे आहेत, अशी तक्रार छिंदम यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

# निमगाव वाघा येथे श्रीराम नवमी उत्साहात



नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीराम नवमीचा पवित्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. गेली सलग ३९ वर्षे ही परंपरा कायम राखत दरवर्षी सप्ताहादरम्यान रामजन्मोत्सव साजरा झाला. श्री नवनाथ महाराज मंदिरात हा धार्मिक सोहळा पार पडला. मंदिर परिसरात रामनामाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून प्रभू श्रीरामांच्या जन्माचे स्वागत केले. त्याचबरोबर भक्तीगीत, अभंग व भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात आशाबाई ठाणगे, वीना बोडखे, कमल शिंदे, सुनीता डोंगरे, अनिता खांदवे, मंदा खळदकर, लता फलके, सुमन ठाणगे आदी महिलांचा सहभाग लाभला.

यावेळी माजी सरपंच साहेबराव बोडखे, पै. नाना डोंगरे, भागचंद जाधव, प्रशांत जाधव, एकनाथ डोंगरे, नामदेव फलके, एकनाथ धायतडक, गोरख फलके गुरुजी, सखाराम फलके, ज्ञानदेव जाधव, अतुल फलके, मारुती फलके उपस्थित होते.

ह.भ.प. विठ्ठल महाराज खळदकर यांनी सांगितले की, प्रभू श्रीरामांचा जन्म हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून तो धर्म, नीती, आदर्श आणि कर्तव्यपरायणतेचा संदेश देणारा दिवस आहे. श्रीरामांनी आपल्या आयुष्यात सत्य, संयम, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा यांचे पालन केले. आजच्या काळात प्रत्येकाने त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याची गरज आहे.

राम म्हणजे मर्यादा, राम म्हणजे कर्तव्य, आणि राम म्हणजे समाजासाठी जगण्याची प्रेरणा. आपण सर्वांनी आपल्या जीवनात रामाचे गुण आत्मसात केले, तर समाजात आपोआप सद्भावना, शांती आणि एकता निर्माण होईल.

# भिंगार छावणीतील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये पाणी टंचाई

### वृक्ष संवर्धनासाठी लष्करी विहिरीतून पाणी देण्याची मागणी


भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये पाण्याची व्यवस्था करण्याबाबत ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांना निवेदन देताना हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ. समवेत छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आणि सदस्य वसंत राठोड.

नगर – भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये उन्हाळ्या–मुळे पाणी टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपने लावलेली व पूर्वीची झाडे जगविण्यासाठी लष्कराच्या डेअरी फार्म परिसरातील विहिरीतून पाणी पुरवठा करण्याची मागणी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांना निवेदन दिले आहे.

हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांची भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आणि सदस्य वसंत राठोड उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे, गेल्या २५ वर्षांपासून हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण व संवर्धनाचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. मात्र, पार्कमधील पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. सध्या शिवाजी पार्कमधील विहिरीवरून पाणीपुरवठा होत असला, तरी ते पाणी कमी प्रमाणात आणि लांब अंतरावरून येत असल्याने संपूर्ण पार्कला पुरेसे पाणी मिळत नाही. यापूर्वी सहा वर्षांपूर्वी उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यावर ग्रुपच्या सदस्यांनी स्वतः पुढाकार घेत टँकरद्वारे महिनाभर पाणीपुरवठा करून झाडे वाचवली होती. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यातही झाडांच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. छावणी कार्यालयाजवळील सर्व्हे नंबर १८४ मधील लष्करी डेअरी फार्म परिसरात मोठी विहीर असून त्यामध्ये मुबलक पाणी उपलब्ध आहे. सध्या त्या विहिरीतील पाण्याचा वापर होत नसल्याने ते पाणी जॉगिंग पार्कसाठी उपलब्ध करून देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यामुळे पार्कमधील पाणीटंचाई दूर होऊन वृक्षसंवर्धनाला मोठा हातभार लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्याची देखील मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह आणि रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित स्मरणिका देऊन गौरविण्यात आले. ब्रिगेडीयर सुनिलकुमार यांनी निवेदनाची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच पार्कमधील पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी २९ मार्च रोजी शहरातील हुतात्मा स्मारकात जनलोक अदालत

### प्रशासन–नागरिक संवादातून योजनांचा लाभ थेट पात्रांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प, पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदचा पुढाकार

नगर – सामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी तसेच कागदपत्रांतील त्रुटींमुळे योजनांपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी जनलोक अदालत हा अभिनव उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार असून, नागरिक, शासकीय अधिकारी आणि तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर आणून समस्या ते समाधान हा प्रवास सुलभ करण्याचा यामागील मुख्य उद्देश आहे.

राज्यात विविध शासकीय योजना उपलब्ध असतानाही अनेक पात्र नागरिकांना त्यांचा लाभ मिळत नाही. रेशन कार्ड नसणे, नावातील किंवा आधारमधील तफावत, अपूर्ण किंवा चुकीची कागदपत्रे तसेच प्रक्रियेबाबत अपुरी माहिती या कारणांमुळे हजारो कुटुंबे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर जनलोक अदालत हा उपक्रम नागरिकांसाठी दिलासा ठरणार आहे. नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनलोक अदालत हे नागरिकांसाठी सुलभ आणि प्रभावी व्यासपीठ ठरणार असून, येथे तक्रारींचे तत्काळ व सामंजस्याने निराकरण केले जाणार आहे. या उपक्रमांतर्गत नागरिक व शासकीय अधिकारी यांच्यात थेट संवाद घडवून आणला जाईल. तसेच दस्तऐवज दुरुस्ती, पात्रता तपासणी आणि अर्ज प्रक्रिया एकाच ठिकाणी पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही.

या उपक्रमाला मेडिएशन ॲक्ट, २०२३ अंतर्गत सामुदायिक मध्यस्थीचा स्पष्ट कायदेशीर आधार मिळत आहे. याशिवाय सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमधून वादांचे न्यायालयाबाहेर सामंजस्याने निराकरण करण्यास प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे जनलोक अदालत ही संकल्पना केवळ सामाजिकच नव्हे, तर कायदेशीरदृष्ट्याही सक्षम ठरणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अहिल्यानगर येथे २९ मार्च रोजी आयोजित जनलोक संडे स्कूल या आरोग्य मार्गदर्शन शिबिरातून या उपक्रमाची पायाभरणी होणार आहे. या शिबिरानंतर जिल्हास्तरावर जनलोक अदालत आयोजित करण्याची रणनीती निश्चित केली जाईल. तसेच पुढील काळात संपूर्ण महाराष्ट्रभर हा उपक्रम विस्तारण्याचा संकल्प करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष पात्र नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. कागदपत्रांमधील अडथळे कमी होतील आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ होईल. कोणीही आपल्या हक्कांपासून वंचित राहू नये हा उद्देश साध्य करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले.


महानगरपालिकेच्या जनरल बोर्ड मीटिंगमध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा वेस पाडण्याची मागणी शहरातील ५७ नगरसेवकांनी केली आहे.

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा वेस पाडण्याची ५७ नगरसेवकांनी केली मागणी

### विशेष सभा घेण्यासाठी महापौर ज्योती गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांना निवेदन

नगर – महानगरपालिकेच्या जनरल बोर्ड मीटिंगमध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा वेस पाडण्याची मागणी शहरातील ५७ नगरसेवकांनी केली आहे. सदर निवेदनावर नगरसेवकांच्या सहया आहेत. महापौर ज्योती गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांना निवेदनाव्दारे मागणी केली.

या निवेदनात म्हटले आहे की, फुले दांपत्य स्मारक समितीने यापूर्वी ११ मार्च रोजी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी माळीवाडा परिसरातील अतिक्रमणे हटवून माळवेढा वेस पाडण्यात यावी. तसेच स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरू करावे. अशी मागणीचे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे यासंदर्भात निवेदन दिले होते.

माळीवाडा वेस ही सुमारे ४०० वर्षे जुनी असून तिची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. तसेच प्रस्तावित स्मारकासाठी उपलब्ध जागा अपुरी पडत असल्याने वेस पाडण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे म्हणणे आहे. समितीच्या मते, स्मारक असे उभारण्यात यावे की ते भोवतालच्या पाचही रस्त्यांवरून स्पष्टपणे दिसावे. तसेच स्मारकाभोवती आकर्षक विद्युत रोषणाई, सुशोभीकरण आणि संरक्षणासाठी कुंपण करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला साजेसा स्मारक उभारण्यासाठी महानगरपालिकेच्या विशेष महासभा तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी ५७ नगरसेवकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# पुरातत्व विभाग, न्यायालयाचा आदेश डावलून माळीवाडा वेस पाडण्याचा निर्णय घेतल्यास संबंधित सर्वांवर गुन्हे दाखल करणार

नगर – पुरातत्व विभाग, न्यायालयाने माळीवाडा वेस पाडण्यास मनाई केलेली आहे. तरीही हा आदेश डावलून माळीवाडा वेस पाडण्याचा निर्णय घेतल्यास त्या ठरावावर सही करणारे नगरसेवक तसेच महापौर, आयुक्त व वेस पाडण्यास जबाबदार असणारे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करु असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे गटनेते दत्ता कावरे यांनी दिला आहे.

आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हंटले आहे की, माळीवाडा वेस ही ४०० वर्षापुर्वीची ऐतिहासिक वास्तु आहे. तसे पत्र पुरातत्व विभागाने औरंगाबाद विभाग पुरातत्व विभागाला पाठविले आहे. भारत सरकार पुरातत्व विभागाने माळीवाडा वेस हिचे संवर्धन करावे, सुशोभिकरण करावे, पुरातत्त्व विभागांतर्गत येणारी ही वास्तु महानगरपालिकेने पाडु नये, तिचा सांभाळ करावा असे पत्र तत्कालिन आयुक्त यांना १३ सप्टेंबर २०११ रोजी दिले. हे पत्र १९ सप्टेंबर २०११ रोजी मनपाने स्विकारले आहे. याही प्रक्रियेत जिल्हा न्यायालयाने हस्तक्षेप करुन १० नोव्हेंबर २०१० रोजी वेस पाडु नये याकरिता मनाई हुकुम आदेश दिला असून ही वेस पाडण्याबाबत काही नगरसेवकांनी ठराव पत्र आपणाकडे दिले आहे. तरी ठराव करुन व न्यायालयाचा, पुरातत्व खात्याचा आदेश डावलुन आपण माळीवाडा वेस पाडण्याची कारवाई केली तर आम्ही ठरावावर सही करणारे नगरसेवक तसेच महापौर, आयुक्त व वेस पाडण्यास जबाबदार असणारे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करु. न्यायालयाचा व पुरातत्व विभाग, भारत सरकार यांच्या आदेशाची पायमल्ली आपण करु नये असे ही कावरे यांनी म्हंटले आहे.

# बोल्हेगावात एकावर कोयत्याने हल्ला

नगर – बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथे दुचाकीचा कट लागल्याचा जाब विचारल्याने एकावर लोखंडी कोयता आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लक्ष्मण जयराम काशिद (रा. चोभे, बोल्हेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मुलगी २६ मार्च रोजी रात्री घराबाहेर सायकल खेळत असताना आरोपी सिध्देश घोडके याने त्याच्या ताब्यातील दुचाकीने मुलीला कट मारला. याचा जाब विचारण्यासाठी काशिद गेले असता आरोपीने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी सिध्देश दिनेश बुरकुले याने हातातील लोखंडी कोयत्याने काशिद यांच्या डोक्यावर आणि हाताच्या अंगठ्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

या घटनेवेळी आरोपी दिनेश बबन बुरकुले आणि उमा दिनेश बुरकुले यांनीदेखील फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबाला अश्लील शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. जखमी लक्ष्मण काशिद यांना उपचारासाठी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सिध्देश घोडके, दिनेश बुरकुले, उमा बुरकुले आणि सिध्देश बुरकुले यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण करत आहेत.

# आचार्यजींच्या विचाराने पशुसेवेचे कार्य प्रेरणादायी

### आनंद भंडारी यांचे प्रतिपादन, आचार्य आनंदऋषीजी महाराज स्मृतिदिनी मोफत पशू आरोग्य शिबिर; १४८ जनावरांची तपासणी






राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पशू आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे दीपप्रज्वलन करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी. शेजारील संस्थेच्यावतीने जनावरांची तपासणी करून आवश्यक लसीकरण व औषधोपचार करण्यात आले.

नगर – आचार्यजींनी संपूर्ण आयुष्यभर क्षमा, शांती आणि संयम या तत्वांचा पुरस्कार केला. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी आपण स्वतः या शहरात उपस्थित होतो, असे सांगत आचार्यजींनी प्राणीमात्रांवर दया करण्याचा संदेश दिला, त्यांच्या विचाराने हे पशुसेवेचे कार्य प्रेरणादायी असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी मनोगतात स्पष्ट केले. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो. जायंट्ससारख्या सामाजिक संस्थांमुळे समाजाची जडणघडण होत असून, शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या कार्याचा गौरव केला.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त २८ मार्च रोजी जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पशू आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १४८ जनावरांची तपासणी करून आवश्यक लसीकरण व औषधोपचार करण्यात आले. विशेष म्हणजे, या उपक्रमाचे हे सलग २९ वे वर्ष ठरले.

नगर–पुणे महामार्गावरील जुने बस स्थानकाजवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालय येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते पार पडले. पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

यावेळी डॉ. उमेश पाटील यांनी पशुसेवा हीच ईश्वर सेवा असल्याचे सांगत मुक्या प्राण्यांप्रती दयाभाव ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले. ते म्हणाले की, पशुपक्षी आपल्या भावना त्यांच्या वेगळ्या भाषेतून व्यक्त करतात. त्यांच्या वेदना समजून घेऊन पशुवैद्यक त्यांच्यावर विविध प्रकारचे उपचार करतात. त्यामुळे मुक्या प्राण्यांच्या दुःखाची जाणीव ठेवून संवेदनशीलतेने त्यांची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. मुकुंद राजळे यांनी जायंट्स ग्रुपतर्फे सातत्याने आयोजित केले जाणारे हे शिबिर अत्यंत दिशादर्शक असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, जनावरांना बोलता येत नसल्यामुळे त्यांच्या रोगाचे निदान करणे हे अवघड असते. त्यामुळे अशा शिबिरांद्वारे त्यांच्या आरोग्याची तपासणी व उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी सांगितले की, या शिबिराचे यंदा २९ वे वर्ष आहे. या उपक्रमात गाय, बैल, घोडे, कुत्रे, शेळ्या आणि मांजरांसाठी अँटी–रेबीज व धनुर्वात लसीकरण तसेच जंतनाशक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. अजय मेडिकलतर्फे सातत्याने औषध पुरवठा होत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शिबिरात डॉ. मुकुंद राजळे, डॉ. ज्ञानेश्वर काळे, डॉ. दशरथ दिघे, डॉ. गणेश गव्हाणे, डॉ. निमसे, डॉ. कार्तिक शिंगटे, डॉ. सुधाकर गिते, मानस चिंताबर, आकाश चोपडे, डॉ. तुषार घुले, नीता गरकल, डॉ. प्रणव गडाख आणि कांचन कवडे यांनी तपासणी व उपचार केले.

स्मृतिदिनानिमित्त जायंट्स ग्रुपच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबवण्यात आले. पांजरपोळ गोशाळेत जनावरांसाठी चारा वाटप करण्यात आले, व्हीआरडी येथील महानुभव आश्रमात वृक्षारोपण करण्यात आले, तसेच आनंदधाम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सदस्यांनी सहभाग नोंदवला, अशी माहिती अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी दिली.

शिबिरासाठी वीरबॅक निमल हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड व इंटास कंपनी यांनी मोफत औषधांचा पुरवठा केला. यावेळी कंपन्यांचे प्रतिनिधी ज्ञानेश्वर जाधव, समीर वाकोडे, प्रशांत मुठे आणि अविनाश घोलप यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, अजय मेडिकलचे संचालक दर्शन गुगळे, नूतन गुगळे, माजी अध्यक्ष अनिल गांधी, दीपक मुथा, सौ. अनिता मुथा, अभय मुथा, अमित धोका तसेच महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गांधी यांनी केले. अमित मुनोत यांनी आभार मानले.

